किरकोळ अंकास ..........०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१॥६
दुसरे खेपेस ......०१

Six monthly........ 6 as.
Single copy........ 1as

Advertisement
Below 10 lines.. 2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERA SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 11 JUNE 1894 NO 23

वर्ष २८ आकोळ सोमवार तारीख ११ माहे जून सन १८९४ इ० अंक २३

### सब नजरबंदीच्या माकडचेष्टांस हाणून पाडनां येनें.

मी रस्त्यांत जेव्हां लोकांशीं खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुम्हासही खास त्याच्यां सारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात म्हणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचे पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वींसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्वाशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस हाणूत पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां म्हणून खाण्याचा घास घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्याप्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोंपेचा क्रम अगदीं बदलला. झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्यावेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी; हलक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सबरोळ पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळींनें व वैद्यांनें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्यापासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुम्हास थोडक्यांत निवेदन करतों कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरपा [म्हणजे माता सिजेलचा रोगहारक पाक] तुम्हास फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या म्हणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी म्हणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटलें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविकासारखें वाटलें. मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हा ताजातवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेंसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपात डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगता येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच

मी तुमचा उपकार मानणारा
(सही) जे. सी. सिमसन
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्युकास्टल अंडर लाईन, स्टाफर्ड शियर इंग्लंड.

B. T.

## पत्रव्यवहार

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते यांस

वि. वि. शाळाखात्यांत कमी पगारावर काम करणाऱ्या मास्तरांची स्थिति पाहिली असता शोचनीय दिसते. ती तशी होण्यास मुख्य कारण हटलें म्हणजे इकडे मराठीपेक्षां इंग्रजी शिकविणाऱ्या मास्तरांचें महत्व अधिकारी जास्त मानितात हेंच असलें पाहिजे. ही त्यांची समजूत सर्वैव बरोबर आहे असें कोणास ही म्हणतां येणार नाहीं. जरी प्रस्तुतच्या इंग्रजी राज्या मुळें इंग्रजी भाषेचें महत्व इतर कोणत्याही भाषे पेक्षां अधिक मानणें जरूर आहे तरी वऱ्हाड शाळा खात्याचे अधिकारी मानितात इतकें मराठीचें महत्व खरोखर कमी नाहीं. मराठी चौथी आणि पांचवी इयत्ता शिकविणारा मास्तर १० किंवा १२ रुपयांचा असला तरी हरकत नाहीं परंतु इंग्रजी तिसरी इयत्ता म्हणजे जिल्हा इकडे सातवी इयत्ता म्हणतात ती शिकविणारा मास्तर मात्र ३०।४० किंवा ५० रुपयांचा असावा लागतो. इकडे पांचव्या इयत्ते पासून इंग्रजी शिकविण्यास आरंभ करितात. तेव्हां चार इयत्ता मध्यंच जें कांहीं स्वभाषेचें ज्ञान मुलांस होईल तितकेंच. तें किती अल्प असतें याचा अनुभव बहुतेकांस असेलच. पुढें जें मराठी ज्ञान मुलास द्यावयाचें तें तर शिकविण्याची तऱ्हा फारच विलक्षण आहे. म्हणजे इंग्रजी अभ्यास संपल्या नंतर राहिलेल्या थोड्या अवकाशांत दररोज शिक्षक मराठी सर्व विषय मुलास शिकवित असतात. मराठी कडे अगोदरच अधिकाऱ्यांचें दुर्लक्ष व कोठें कोठें शिक्षकांचें तिजविषयीं अपूर्ण ज्ञान या मुळें स्वभाषेचा अभ्यास दिवसें दिवस अधिक न होतां कमीच होत जातो. आणि पर भाषेचें ज्ञान सुलभतेनें संपादन करण्यास मुलें पात्र होत नाहींत. त्यांस इंग्रजी अभ्यास कठीण जातो आणि मध्येंच शाळा सोडिल्यास पोपटा प्रमाणें संपादन केलेलें स्वभाषेचें व इंग्रजी ज्ञान लवकरच नाहीसें होऊन तीं मुलें व्यवहारांत निरुपयोगी ठरतात. ज्या ठिकाणीं मराठीची ही दुःस्थिति तेथें ती शिकविणाऱ्या मास्तरांची चांगली स्थिती कोठून असणार? आश्चर्य म्हणून इतकेंच वाटतें कीं खात्यांतील सर्व अधिकारी नेटीव असून बिचाऱ्या स्वभाषेची अशी पायमल्ली होत आहे कीं तिला कोणी ही विचारीत नाहीं.

ज्याला कोठें ही इतर खात्यांत थारा मिळत नाहीं तोच बहुत करून ह्या शाळा खात्यांत शिरतो तेव्हां चांगल्या लोकांची कमताई खात्यांत असणें साहाजिक आहे. असें आहे तरी कित्येक चांगले चांगले शिक्षक दुसरी कडे जाण्यास आश्रय नसल्यानें व स्वतःच्या विपन्न स्थिती मुळें खात्यांत नौकरीत आहेत. परंतु अधिकाऱ्यांच्या लहरी स्वभावामुळें त्यांस आपलें डोकें कधींच वर करितां आलें नाहीं. या शाळा खात्यांत पाहूं गेलें असतां लोअर क्लास स्कुलांच्या संबंधानें अन्याय विशेष घडतो. एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेबांची अशी समजूत आहे कीं शिक्षक म्याट्रिक्युलेटेड असला म्हणजे तो सर्व प्रकारचें शिक्षण देण्यास योग्य असतो. इतर अयोग्य. आणि अशीच माजी डायरेक्टर साहेबांचीही समजूत होती. ती मुळें म्याट्रिक्युलेटेड न झालेल्या शिक्षकांस आपलें काम अधिकाऱ्यांच्या इच्छे प्रमाणें करून दाखवून आपल्या योग्यते प्रमाणें खात्यांत प्रमोशन मिळविण्याची आशाच नसते त्यास काळजीनें काम करण्याची हुरूप बिलकूल राहत नाहीं. म्याट्रिक्युलेटेड झाला म्हणजे तो उत्तम शिक्षक असतो ही समजूत म्हणजे बरोबरच आहे असें वाटत नाहीं. असे पुष्कळ म्याट्रिक्युलेटेड शिक्षक पाहण्यांत आले आहेत कीं ज्यांस आपलें कर्तव्य योग्य रितीनें बजावितां येत नसून त्यांच्या वास्तविक योग्यतेपेक्षां त्यांस पगार अधिक मिळतो. त्यांचें मराठी भाषेचें ज्ञान इतकें अकटोविकट असतें कीं स्वभाषेंत पत्र सुद्धां शुद्ध रीतीनें लिहितां येत नाहीं तेव्हां अशा लोकांस त्यांच्या वास्तविक योग्यते पेक्षां जास्त पगार मिळावा आणि शिक्षण कला ज्यास उत्तम साधली आहे परंतु म्याट्रिक्युलेटेड नाहींत म्हणूनच अधिक प्रमोशन मिळविण्यास जे नालायक आहेत अशा लोकांनीं दैन्यदशा विपरीत मानून स्वस्थ बसावें हें अधिकाऱ्यांच्या न्याय दृष्टीचें किती निदर्शक आहे याचा वाचकच आपल्या मनांत विचार करितील. वास्तविक पाहतां प्रत्येक मास्तरास आपल्या तक्त्यांतील इयत्ता कशी तरी शिकविण्या पुरतें ज्ञान असतेंच. परंतु शिक्षण ही एक प्रकारची कला आहे. ही सर्वांस सारखी साधत नाहीं. नुसता म्याट्रिक्युलेटेड झाला म्हणजे शिक्षणपटु झाला असें होत नाहीं जो शिक्षक त्याज कडे नेमून दिलेलें काम योग्य तऱ्हेनें बजावतो व ज्याला शिक्षण कला चांगली साधली आहे त्यास त्याच्या कर्तव्यावद्दल योग्य पारितोषिक अधिकाऱ्यां कडून मिळालेंच पाहिजे. तो म्याट्रिक्युलेटेड नाहीं अथवा बि. ए. नाहीं म्हणून प्रमोशनास अयोग्य आहे ही सबब पुढें आणणें कधीं ही योग्य होणार नाहीं. खात्याच्या ह्या स्थितीमुळें चांगले शिक्षक पुढें येत नाहींत व प्रांतांत खऱ्या शिक्षणाचा प्रसार घडत नाहीं.

या वरून सर्वच म्याट्रिक्युलेटेड लोक आपल्या कर्तव्यास अयोग्य असतात असें मात्र कोणी समजू नये. सांगावयाचें म्हणून इतकेंच कीं अधिकाऱ्यांचें धोरण शिक्षकां कडून घडणाऱ्या कामाकडे असावें. तो अमुक शिकला आहे म्हणून प्रमोशनास योग्य व इतर अयोग्य असें मानणें कधीं ही न्याय होणार नाहीं आणि त्या पासून खऱ्या शिक्षणाचा प्रसार न होतां चांगल्या शिक्षकांस आपलें काम जास्त चांगल्या तऱ्हेनें बजाविण्याची उमेद येणार नाहीं हें उघड आहे. बहुतेक शाळा खात्यांतील लोक इतर खात्यांत शिरण्या करितां रात्रं दिवस कसे धडपडत असतात! ज्यांचा लाग साधतो ते कमी पगारावर सुद्धां निघून जातात. हें कशाचें फळ आहे? याचा खात्याच्या अधिकाऱ्यांनींच आपल्या मनांत विचार करावा म्हणजे कळून येईल. अयोग्यास मान, योग्याची अवहेल-

ना होऊं लागली म्हणजे असा प्रकार घडावयाचाच ह्यांत संशय नाहीं. म्हणून अधिकाऱ्यांनीं आपल्या हातून सहसा अन्याय होऊं न देण्याविषयीं रात्रं दिवस जपलें पाहिजे. आपण करितों तेंच चांगलें अशी समजूत होऊं देतां कामा नये.

लोअर क्लास स्कुलांच्या संबंधानें व कमी पगारांच्या मास्तरां संबंधानें खात्यांत इतका अंधार आहे कीं, त्यांत प्रमोशन मिळणें हें कशावरच अवलंबून नाहीं. त्यांस बहुत करून डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेबांच्या लहरीवर प्रमोशन मिळत असतें. तेव्हां अर्थात् न्याय कितपत राखिला जात असेल हें उघड आहे. जो जितका हांजी हांजी करण्यांत चतुर तितका तो अधिक प्रमोशनास पात्र, अशी स्थिति असल्या वर योग्य शिक्षणप्रसार हटकून कसा होईल हें समजत नाहीं. अगोदरच लोअर क्लास स्कुलांतील मास्तरांची पगाराची वाढ काय ती २५ रुपयां पर्यंत. त्यांतही पात्रापात्र विचार नसला म्हणजे चांगल्या शिक्षकांची माती होणें साहजिक आहे. खात्यांतील शेवटल्या जागा ६,८, १० रुपयांच्या असल्या मुळें चांगले शिक्षक मिळत नाहींत. त्या योगानें आद्य शिक्षणाचा पायाच मुळीं कच्चा राहतो. तेव्हां वरील इमारतीच्या बळकटीची अशा करणें व्यर्थ आहे.

परीक्षकांची अशी एक रीत पाहण्यांत येते कीं, वरचे क्लास भरून शिक्षकांस काम पुष्कळ असावें म्हणून खालच्या इयत्तेंत पास झालेल्या मुलांबरोबर नापास मुलांसही प्रमोट करून भरती पूर्ण करितात. कधीं कधीं पास झालेल्या मुलां पेक्षां ह्या नापास मुलांची संख्या क्लासांत अधिक असते. तेव्हां अशा रीतीनें क्लास भरून पुढील सालीं शिक्षकाचें काम चांगलें झालें नाहीं म्हणून त्यास दोष देणें हें कधी तरी न्याय होईल काय! व अशा पासून खऱ्या शिक्षणाचा प्रसार होईल काय ? मुळींच होणार नाहीं हें उघड आहे. एखाद्या लहान व अशक्त मुलाच्या डोक्यावर मोठा बळकट मनुष्य सहज वाहून नेईल असें ओझें देऊन त्याला तें वाहतां आलें नाहीं म्हणून त्यास नामर्द म्हणणें ह्या सारखेंच हें वरील कृत्य आहे. अशा पासून फायद्या पेक्षां उलट तोटा मात्र हा दृष्टीस पडतो कीं, आळशी मुलांस उत्तेजन मिळतें. जीं मुलें वार्षिक परिक्षेंत नापास होत असतात तीं बहुत करून आपल्याच दोषामुळें होत असतात. त्यांच्या चुकीबद्दल त्यांसच शिक्षा मिळणें अधिक रास्त आहे. वरील रीतीनें ती त्यांस न मिळतां बिचाऱ्या निरपराधी मास्तरास मात्र भोगावी लागते. ह्याचा कांहींच विचार अधिकाऱ्यां कडून घडत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे.

मिडल क्लास स्कुलांतील मास्तरांचे पगार वाजवीपेक्षां किती अधिक आहेत आणि लोअर क्लास स्कुलांतील मास्तरांचे पगार किती कमी आहेत ह्याचा विचार केला म्हणजे अधिकारी मराठी शिक्षणाची योग्यता आपले मनांत किती समजतात ह्याचा उत्तम बोध होईल लोअरक्लास स्कुलांत कित्येक मास्तर असें पाहण्यांत येतात कीं, ज्यांच्या अंगीं शिक्षण कला उत्तम रीतीनें वास करीत असून ज्यांस स्वभाषेचें ज्ञान चांगलें आहे आणि जरूर पडल्यास सातव्या इयत्तेपर्यंत इंग्रजी भाषेचें शिक्षण ज्यांस योग्य रीतीनें मुलांस देतां येईल परंतु ते म्याट्रिक्युलेटेड नसल्या कारणानें अगर तिकडचे लोक इकडे घ्यावयाचे नाहींत असा वरिष्ठांचा निर्बंध असल्या कारणानें त्यांच्या योग्यतेची बिलकुल किंमत मानली जात नाहीं. तसेंच मिडलक्लास स्कुलांत ज्यांना चौथी इयत्ता सुद्धां उत्तम शिकवितां येणार नाहीं असे मास्तर असून ते वरिष्ठांच्या केवळ कृपेनें मिळणारा पगार प्रत्येक महिन्यास खिशांत घालून सुखानें आपल्या जागेचा अनुभव घेत असतात. परंतु इकडे कोणीच लक्ष देत नाहीं. हें मोठें आश्चर्य आहे. हायस्कुलांतून इंग्रजी शिकविणारांचें महत्व विशेष मानिल्यास चालेल परंतु मिडल क्लास स्कुलांत ( कीं जेथें इंग्रजी पेक्षां मराठीच विषय अधिक शिकवावे लागतात ) आणि लोअरक्लास स्कुलांत ज्यांस स्वभाषेचें ज्ञान उत्तम असून शिक्षण कलेंत कुशल असा इमानें इतबारें आपलें कर्तव्य बजाविणाऱ्या मास्तरांसच अधिकाऱ्यांनीं अधिक उत्तेजन दिलें पाहिजे. तेथें मराठीपेक्षां इंग्रजी शिक्षणाची प्रौढी विशेष मानणें कधींही रास्त होणार नाहीं.

हल्लीं अशा गोष्टी वारंवार पाहण्यांत येतात कीं, एखादी मोठ्या पगाराची जागा खालीं झाली म्हणजे खालच्या लोकांच्या हक्काकडे लक्ष न देतां अधिकारी नवाच एखादा मनुष्य ज्याला शिक्षकाच्या कर्तव्याचा मुळींच अनुभव नाहीं अशास ती जागा देऊन हक्कदार लोकांस नाउमेद करितात हो किती दुखाची गोष्ट आहे बरें ! कोणीहि मनुष्य खात्यांत नोकरी करितो तो आपलें काम आपण उत्तम बजाविलें म्हणजे आपणास नंबरवारीनेंच बढती मिळेल अशी आशा धरून करितो. परंतु ह्या खात्यांत त्याची ती आशा ठिकाणींच राहून त्यास हात चोळीत स्वस्थ बसावें लागतें. पंधरा रुपयांचीं कां जागा खालीं होईना. अधिकाऱ्यांनीं नवा कोरा, अननुभविक असा एखादा म्याट्रिक्युलेटेड आणून तेथें दडपलाच. म्हणजे खालच्या हक्कदारांनीं आजपर्यंत सरकारची ताबेदारी केली ती फुकटच गेली. अशावेळीं त्यांस किती वाईट वाटत असेल ह्याचा विचार वाचकांनींच करावा. हा घडघडीत अन्याय डोळ्या समोर पाहून त्या बिचाऱ्यांस दाद मागण्यास हो कोठें ठिकाण राहत नाहीं. ह्या खात्यांत कित्येक लोक इतके दुर्दैवी आहेत कीं काम चांगलें करून हो दहा दहा वर्षांत प्रमोशनाची गांठ ज्यांस पडली नाहीं. आपणास भरपुर पगार मिळाला म्हणजे गरबाची कोणीही काळजी वाहत नाहीं हें मात्र खरें आहे. दुसरीकडे कोठें आश्रय नसल्यामुळें त्या बिचाऱ्यांस चुबत वरिष्ठांच्या अन्यायाची फळें भोगावीं लागतात. हल्लीच्या काळांत कोणास हो प्रमोशन मिळणें फार दुरापास्त आहे आहे असें म्हणावें तर कित्येक परीक्षकाचे प्रिय व खुशामती मास्तर कर्तव्य नीट न बजावितांही भराभर वाढतात. तेव्हां खरोखर हा अन्याय नाहींसा होऊन प्रमोशन देण्याची कांहीं तरी शिस्त अधिकाऱ्यांनीं लावून ती प्रमाणें नेहमीं त्यांनीं वागलें पाहिजे. आपले हातीं अधिकार आहे म्हणून वाटेल त्याचें वाटेल त्या प्रमाणें नुकसान करणें अगर लोकांच्या हक्कांकडे लक्ष न देणें अधिकाऱ्यांस कधीं हो भूषणावह होणार नाहीं. अधिकाऱ्यानें आपणास नियमबद्ध करून घेतल्या शिवाय त्याचे हातून कधीं हो सत्कृत्य घडावयाचें नाहीं.

हल्लींचे नवीन डायरेक्टर साहेब इकडे आपलें पूर्ण लक्ष देतील व खात्याची बारीक तपासणी करून वरील अन्याय दुःखानें होरपळून गेलेल्या लोकांचें आजपर्यंत झालेलें नुकसान होईल तितकें आपल्या हातून भरून काढण्याची खटाट करून सर्वांस सारखा न्याय देतील अशी फार आशा आहे. तेणें करून त्यांची सर्वत्र ख्याति होऊन ते गरीब लोकांच्या आदरास खरोखरच पात्र होतील ह्यांत संशय नाहीं. ज्या अर्थी ईश्वरेच्छेनें खात्याचें सर्व सूत्र त्यांच्या हातांत आलें आहे त्या अर्थी त्यांनीच इकडे लक्ष विशेष दिलें पाहिजे. त्यांस परमेश्वर अशी सुबुद्धि देवो अशी प्रार्थना करून हा कंटाळवाणा परंतु अत्यावश्यक लेख पुरा करितों.

आपला
"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुद्ध ७ शके १८१६

## मनोराज्यांतील बंडें

मनुष्याची कल्पना कशी व केव्हां धांवेल या विषयीं कांहीं नियमन अथवा धरबंध असल्या विषयीं आह्मास माहित नाहीं. कल्पनासृष्टींत कधीं कधीं खऱ्या विश्वकर्म्याला देखील लाजविणाऱ्या गोष्टी दिसून येतील. सन १८५७ सालचें बंड आमच्या वृद्ध माणसा पैकीं कित्येकांना पाहून ठाऊक आहे व कित्येकांना बंडाच्या धामधुमी ऐकून ठाऊक आहेत. परंतु त्या खऱ्या बंडाचें नाटक आज ३६।३७ वर्षांनीं आह्मास पहावयास सांपडलें आहे. नाटकांतला कटका बंडावा, लढाई, व धरपकड यांनीं आह्मास अगदीं त्राही त्राही करून सोडलें आहे. बिहार प्रांतांत या नाटकाचें स्थळ योजिलें होतें. प्रथम अंकीं त्या भागांतील आम्रवृक्षांस चिखलाचे चांद चिकटविलेले सर्वत्र दिसूं लागले. या चिखलाच्या खुणा लोकांस बंड करण्या साठीं इषारा होता असा आंग्लो-इंडियनांचा ग्रह जगजाहिर झाला. गाईचा केस प्रत्येक चांदा मध्यें आहे असें ठरलें. याचा उगम गोरक्षणी सभा मधून झाला असा सिद्धान्त उजेडांत आला. हिंदु मुसलमानाच्या चकमकी झडतील असें कुतर्क लोक करूं लागले आणि त्याच्या परिणामीं इंग्रजी राज्य बुडेल असेंही राजद्रोहदर्शक प्रयत्न हिंदु लोकांवर लादण्यांत आले. बंडाचीं पूर्व चिन्हें सर्वत्र हरहर व दिन दिन करीत चेकावलीं आणि इंग्रजी राज्याचा अंतकाळ जानिक ठेपला असें आंग्लो इंडियन बडबडूं लागले. जणूं काय या नाटकाचा शेवट गोड व आनंदपर्यवसायी करण्यासाठीं एका रात्रीं मद्यपात्र पालटल्या नंतर कांहीं साधु बैरागी चिखलाचे चांद चिकटवितांना पकडण्यांत आले. बिगुल व तुताऱ्या वाजल्या त्या बरोबर पलटणी हत्यारबंद पुढें येऊन त्यांनीं त्या बंडखोरांस गराडा दिला! अशी सरासरी समाप्ति झाली खरी. परंतु या नाटकाचा अर्थ काय ?

आह्मी वरील गोष्टीस मनोराज्यातलें बंड ही संज्ञा दिली आहे त्याला कारण कीं वरील बिहार प्रांतांतील बंडाच्या गोष्टी अगदीं निराधार, बनावट व फसवणुकीच्या आहेत असें मुंबईच्या प्रत्याहिक पत्रावरून समजतें. आम्रवृक्षा वरील चिखलाच्या खुणा विषयीं बातमी विजे प्रमाणें विलायतेंत चमकली तेव्हां सर्व राजकीय नभोमंडळ अस्ताव्यस्त झालें व राजद्रोह, बंड, व राज्यक्रांती याच्या गोष्टींनीं सर्व वातावरण भरून गेलें. जो उठला तो तोंडसुख यथेष्ट नेटिवावर व मुख्यत्वें करून हिंदु लोकांवर घेऊं लागला. हा प्रकार खरा असता म्हणजे कांहीं वेड्या पीरांनीं खरोखर चिखलाचे गोळे झाडाला चिकटवून आपल्या खुळेपणानें बंडांच्या कंड्या पिकविल्या असत्या तर आम्हास आणखी दोन शतकें गुलामा पेक्षां गुलाम राहावें लागलें असतें. सुधारलेल्या गुलामगिरीचा ससेमिरा आमच्या मागें लागलाच आहे अशा वेळीं हें नवें विघ्न ओढवलें असतें. परमेश्वर कृपेनें आम्ही विमल कीर्तीचे, पवित्र आचरणाचे व राजनिष्ट शीलाचे आहो तसेच राहो निवालों हें दुःखांत सुख समजलें पाहिजे. इंग्रजी राज्यावरच आमचा भाग्योदय अवलंबून आहे आणि आमचा राष्ट्रीयपणा ब्रिटिश छत्राखालीं चिरकाळ व अभंग राहणार आहे. कालगतीनें इंग्रजांशींच फक्त सख्यत्व संपादन करण्याचें आमच्या नशिबीं आलें आहे परंतु या भाग्याला आमच्या राज्यकर्त्याचा संशयखोरपणा, स्वार्थसाधुपणा, व परोत्कर्षासहिष्णु स्वभाव हीं आडवीं येत आहेत! कांहीं हो होवो, आम्हास एकच मार्ग राहिला आहे आणि इंग्लिश लोक आपोआप त्याज्य होई पर्यंत आम्ही त्यांची कांस सोडणार नाहीं !

खोट्या बतम्यांनीं देखील आमच्या लोकांच्या धीर, गंभीर व उदात्त मनोवृत्ति परीक्षेच्या कसाला लागल्या हें उत्तम झालें परंतु आमच्या वर आमच्या राज्यकर्त्यांचा कोप होईल, त्यांचा विश्वास उडेल व आमचा अपमान होईल अशा गोष्टी घडवून आणण्याचा प्रसंग ज्या खोट्या बंडाच्या बातमी मुळें आला त्या बातमी बद्दल जबाबदार कोण ? अशा नेटिवद्वेष्ट्या लोकांचें पारिपत्य झाल्या शिवाय लोकांच्या मनाला स्थीरता येणार नाहीं.

---

लार्ड लान्स डाऊन अगदीं कळसूत्री व्हाईसराय होऊन गेले परंतु त्यांच्या सूत्रधारांना स्वकीय महत्व वाढविण्या साठीं निर्जीव बाहुलीला मनुष्यपण आणावें लागत आहे. लार्ड लान्सडाऊन लोकप्रिय होते असा प्रथम भेरीनाद केला आणि त्यांच्या त्या बोलक्या चालत्या मूर्तीचा पुतळा स्थापण्याचा कांहीं आंग्लो- इंडियनांनीं विचार केला. पुतळा फंडाचे सेक्रेटरी असें कळवितात कीं एकंदर ९२३२१ रुपये वर्गणी ज-

मळी आहे. तीस कोट प्रजे पैकी अवघे २२२ वर्गणीदार आहेत. या पैकीं कांहीं गृहस्थ इंग्लंडांतले आहेत. ४०० संस्थानिका पैकीं फक्त ३५ रजवाड्यांनीं मिळून ६४५७० रुपये वर्गणी दिली आहे. सर्वांत आश्चर्य व नवल एवढेंच कीं ज्या काशिरच्या महाराजांस लार्ड लान्सडाऊन यांनीं पदभ्रष्ट केलें ते या फंडाचे वर्गणीदार आहेत! लोकप्रिय व्हाइसराय कोणास म्हणावें याचा उलगडा लोकांनीं आपल्या प्रेमदर्शनानें लार्ड रिपन साहेबाच्या वेळीं पूर्वीच करून दाखविला आहे. लोकप्रेमाला मरतें नैसर्गिक रितीनेंच येतें. त्या साठीं निर्जीव पाषाणाचा पुतळा आठवण व स्मरण देण्यास लागत नाहीं. लोकांच्या हृदयकमलांवर लार्ड रिपनची ती उदार मूर्ती सदैव वास करील !

---

मुंबई पुण्याकडे व वायव्य प्रांताकडे गोरक्षणी सभांवर मोठें आरिष्ट आलें आहे. गोरक्षणी सभांच्या चालकांवर मूळ आरोप असा आला आहे कीं, त्यांच्या चळवळीमुळें मुसलमान लोक चिडतात आणि हिंदुमुसलमानां मधील द्वेष, फाटाफूट व वैरभाव हीं अति जोरावर येतात आणि त्या मुळें वारंवार दंगे घडतात. हा आरोप अन्यथा आहे हें अनेक वेळां मागें निर्णीत झालें आहे तथापि मुंबईचे पोलिस कमिशनर मि. व्हिन्सेंट सारखे नेटिवद्वेष्टे लोक गोरक्षणी सभेच्या नांवानें वृथा आक्रोश करीत आहेत.

गोरक्षणी सभेवर जे आक्षेप खोटेनाटे आले आहेत त्यांस एक जोरदार, सणसणीत व मुद्देसुत उत्तर देण्यांत आलें आहे. मुंबईच्या गोरक्षणी सभे मध्यें पुष्कळ लौकिकवान, वजनदार व श्रीमान गृहस्थ आहेत आणि त्यांचे अग्रेसर सर दिनशा माणिकजी पेटीट हे आहेत. त्यांच्या सहीनें हें उत्तर सरकारास कळविलें आहे. अशा लोकांच्या साह्यतेनें कोणत्या ही संस्थेला योग्य महत्व प्राप्त होतें आणि त्यांच्या नांवावरूनच सरकारला गैरशिस्त प्रत्यवाय व अडथळे आणिता येत नाहींत. गोरक्षणी सभेचें काम कायदेशीर, लोकमान्य व अत्यंत हितप्रद आहे आणि त्यांच्या मार्गांत आडवे जे कोणी येतील त्यांस पारिपत्य केल्या वाचून दुसरा उपाय नाहीं. मुसलमान लोक गैरकायदा सैरावैरा वागतील या भितीवर गोरक्षणी सभा आम्ही कालत्रयीं मोडूं देणार नाहीं. महमदी धर्माचे सत्वस्थ व सन्मार्गशील अनुयायीं आहेत ते असल्या गोरक्षणास व्यत्यय कारक नसून या संस्थाचे कट्टे पुरस्कर्ते आहेत.

---

शाळाखात्या संबंधानें एक अलिकडे सर्वोत्कृष्ट चळवळ सुरू झाली आहे त्या चळवळींत विद्यादाते शिक्षक लोक यांचे पगार साधारण गृहस्थाश्रमाला योग्य असे होतील अशी आशा येत चालली आहे. सात रुपये किंवा त्याहून कमी पगारावर जे शिक्षक असतात त्यांना काडी इतका माना नसतो. खाण्या पिण्याची टंचाई, शरीराची निकृष्टावस्था, भिकार कपडालत्ता इत्यादिकांनीं शिक्षक पदवीला ते शोभत नाहींत आणि अर्थातच कामही पयातयाच होतें. तेव्हां आद्य शिक्षणाकडील शिक्षक वर्गाचे पगार अगदीं नादार स्थितींतले असू नयेत व त्यांच्या गरिबीच्या प्रपंचाच्या मानानें अमवित असा ठरावा होण्याचें वाटत आहे. मुंबई व मद्रास या दोन इलाख्यांत वरील सुधारणा स्वल्प वेळांत होतील अशी उमेद आहे आणि तोच कित्ता या प्रांतांत गिरविण्यांत येईल तर बरें!

---

पुण्याच्या रेशमी गिरणीच्या समाप्तीचा प्रसंग येतो कीं काय अशी भिती उत्पन्न झाली आहे. संयुक्त मांडवलानें गिरण्या चालविण्याचा उद्योग नुकता उर्जित दशेस येत आहे अशा वेळीं असा दुर्धर योग येऊं पहात आहे ह्मणून अत्यंत वाईट वाटतें. परंतु पुण्याच्या गेल्या आठवड्यांतील पत्रावरून कांहीं आशांकूर नवीन उद्भवला आहे. जों पर्यंत स्वार्थपटु, चहाडखोर, परोत्कर्षासहिष्णु आविकारप्रकाशांधचक्षु जन आहेत तों पर्यंत केव्हां कोणाचा कसा नाश होईल याचा नियम नाहीं. व्यक्तींना जे नियम लागू आहत तेच संस्थांनाही लागूं आहेत. मोहमेच्या शिल्पकला विज्ञानांत रा. रा. महादेव बल्लाळ नामजोशी यांनीं ज्या उपयुक्त सूचना केल्या आहेत तिकडे मंडळी लक्ष देऊन गिरणीचा व्यूह भक्कम उभरतील तर बरें!

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE, 11 1894

The week that closed itself also closed the service of another most eminent servant of the Educational Department. The exclusion of Mr. G. C. Aitken from the Directorship of the province inspite of his various officiating tenures of the office considerably told on his health. Disappointment hunted him to his retirement. Finding himself unable to do his work with cheer and spirits he withdrew from service as a highly conscientious man! By his retirement the public loses a rigid disciplinarian able to impart principles of straightforwardness, contentedness, independence, and unflinching rectitude of purpose. The results of the Local High School, inspite of numerous odds were ever to advatage under him. Inspite of the unexpressed wishes of his superiors he sacrificed quantity to quality. But an estimate of his worth, in our columns today, would be most inopportune, as this evening the public of Akola are going to bid him a grand farewell which he so richly deserves, and when it is more than probable some one might refer to his services to the Province. Since the news of his retirement was confirmed last week our good townsmen have been busy concerting measures how to bid good bye to him. His house is daily visited by numerous friends of his and inspite of the absorbing topic of a second probable mortification which the new *Native* Director, it is rumoured, proposes to inflict on the graduates whose services could only be secured by express understanding that they would not be passed over, so long as they discharged their duties at least to the best of their powers grand preparations are being made to bid good bye to a venerable sojourner, and well wisher, retiring after every possible disappointment and neglect. This will clearly prove that in this town at least he was fondly beloved, though all who knew him not and the benign and just Government were pleased to ignore him! We are very sorry to have lost in less than three months Rao Bahadur Jathar and Mr. Aitken the noteworthy relics of Dr. Sinclair's time! May both of them long enjoy their well earned rest and may the new Director be as dear to his people as these two retiring officers, the glory of the department! Let us always hope for the best!

---

We attempt a second time to draw the attention of our readers and the Railway Authorities, to the evils that the bulk of the passengers groan under. The Railways are set up and allowed for the use and advantages of the people And it is but evident that they should look to the public convenience. On this side the third class passengers form the main source of revenue but attention that is paid to them seems to be in an inverse ratio. We have sometimes come across instances in which even the statutory Liability is disregarded. Therefore we once more urge on the necessity of taking united action in this case. Individual efforts are made at times to improve this state of things but they seem to secure no change. Unless men act in concert, complain in the legitemate way the things would remain as they are. The much needed reforms in our opinion are:—1st that water—closets should be attached to all through trains. 2nd the windows of the coaching offices should be large and that passengers should not be put to trouble. 3rd. that passengers should be allowed to come on the platform before the train comes and that they should not be let out after the arrival of the train or after the warning bell is given as is done many times; 4th. males and females should not be let out through the same passages; 5thly that railway officers, that come in contact with the passengers be told to conduct themselves properly and to observe the railway regulations.

With this we may by and bye call the attention of the authrities to the injustice they are doing to their servants The Station masters on small stations are required to work for 12 hours from 6 P. M. to 6 A. M. Even the Government signallers are not required to work for more than eight hours a day. Then they are never required to work at night consecutively for two days. Another evil of constant occurrence is that the servants never get leave under pressing circumstances such as even when they lose their near and dear relatives. Besides this there is much high-handedness in the treatment they receive. Even in this matter we would ask the servants to make a common cause and bring their complaints to the notice of the supervising authorities. We think that in case they do this they will receive a kind and sympathetic response. The various guaranteed companies are making large profits. That there is handsome surplus is evident from the erection of buildings like the Victoria Terminus station. We do not therefore think the authorities will grudge to look to the convenience of their servants and thus secure efficient and earnest work.

---

To
The Editor of the Berar Samachar
Sir

While the people are brooding over the sad disappointment caused by the despatch of Secretary of the State for India announcing his views against the Resolution passed by the House of commons in favour of simultaneous examinations it will not be out of place here to give the views of some noble-minded English men with regard to the same question expressed some 60 years ago when the same question was fully discussed in the Imperial Parliament. The question before the Parliament was with regard to the admission of Natives of India to the Higher appointments

The motion regarding admmission was put forth by Lord Gleneg and was seconded by Charles W. Wynne.

He said "the only principle on which India would justly, wisely or advantageously be administered was that of admitting the Natives to a participation in the Govern ment, and allowing them to hold every office the duties of which they were competent to discharge, Instances were adduced of corruption and venality; but were they not the result of our own conduct? Duties of importance devolved upon them, without adequate remuneration either in rank or salary no reward or promotion for fidelity. Why, then complain of peculation and bribery? We made vices, and then punished them?"

Charles W. Wynne (Hansard XIX537)

"I now allude to the wise, benevolent noble clause which enacts that no Native of our Indian empire shall, by reason of his colour, descent, or religion be incapable of holding office. To the last day of my life I shall be proud of having been one of those who assisted in the framing of the bill which contains that clause. Do we think we can give knowledge without awakening ambition, or do we mean to awaken ambition, and provide it with no legitimate vent— "

Lord Macaulay
(31st Hansard XIX534 and 35)

"Among the means of reducing expense was the very desirable one of reducing gradually the number of Europeans employed in establishments in India, and bringing forward, gradually however, and with extreme caution, the most deserving among the Natives, by employing them in situations of higher trust and authority, than they were accustomed to fill. If these measures should pursued firmly, but with extreme caution, always regarding to the interests and habits and feelings of individuals in question, be confindently looked for ward to an amelioration of the revenue of India" —Lord Ellenborough
(2 Hansard XXII25).

How liberal, noble and Englishman—like are the above—mentioned views! and I hope that return will soon be effected to these ever—lasting principles of a just and foreign administration.

Amraoti
7-6-1894

Yours truly
Pro bono publico.

---

The statements as copied from the last Administration report will clearly showe that the easy and possible extnt af agriculture has come to a stand still and the chances are that it is not likely within moderate means to bring new land under cultivation. We hope that the people will turn their attention to the mineral wealth of the province and the second qudation puts forth a lucrative advanture in industry Let people take a note of it:—

"The area occupied by cultivators now amounts to 7,743,621 acres, or about 12,000 square miles, and it may be said that all the land that can profitably be tilled, and has not been reserved in connection with the requirements of the province in respect of forests and grazing lands, has been taken up. There has been a further increase in the land revenue of Rs. 1,05,629. There has been a large increase, also, in agricultural stock, the number of cattle being reported at 205,600 head more than in 1882-83. The value of the rail-borne trade of Berar was last year:—

Exports... ... Rs. 3,62,39,608

☞ पान ५ पुरवणी पहा.

वाई नवळच्या एका गांवच्या लोकांनीं माहामारीची बोळवण दुसऱ्या गावच्या वेशीवर पोंचविशी ह्मणून त्या दोन गांवच्या लोकांची मारामार होऊन कांहीं लोक लंगडे पडले.

हिंदुस्थानचा हत्यारांचा कायदा वऱ्हाड प्रांतांस लागू करण्याचें ठरलें आहे.

रशियांत चहुकडे कांहीं एक राजकीय बेत चालला आहे असें आढळून आलें व त्या बद्दल ही धरपकड चालू आहे.

बगदादच्या महापुरानें बगदाद शहर व आसपासचीं खेडीं यांचें फार नुकसान झालें असें समजतें.

लार्ड राबर्ट यांचे लार्ड वोल्सली यांच्या जागीं ऐर्लंडात नेमणूक होत आहे.

खालच्या प्रतीच्या देशभाषांच्या शाळांच्या विद्यार्थांस पोष्टखात्याच्या कामाची कांहीं माहिती शिकविण्याची सुरवात करावी असें त्या खात्याच्या अधिकाऱ्याचें ह्मणणें आहे.

आंब्याच्या झाडांस चिखल थापण्याचा प्रकार अलहाबादेपर्यंतही आला. हे आम्रवृक्षावर मातीचे गोळे चिकटविणारे २०।२५ साधुबैरागी असून त्यास पहाटेच्या दोन तीन वाजतां पलटणीच्या शिपायांनीं वेढा देऊन कैद केलें असें हा 'मार्निंग पोस्ट' कर्ते छापतात.

गेल्या एप्रिल महिन्यांत हिंदुस्थानांत २,८८,७८,६९० रुपयांचा माल जास्त आला व ९४,१८,९९० रुपयांचा जास्त बाहेर गेला असें सांगतात.

स्टाटुटरी सनद्यांना हल्लीं जें पगार मिळतो. ह्मणजे शेकडा ६६।१०८ मिळतात त्याच्या बद्दल आतां शेकडा ६४ मिळणार असें सांगतात हा चांगला न्याय म्हणावयाचा!

चहूंकडे गडबड करून देणारे आंब्याच्या झाडांवरचे चिखलांचे लेप हे गोपिचंदनाचे आहेत. असें आतां बाहेर आलें आहे. पण आतां निराळेंच प्रसिद्ध झालें आहे कीं मातीच्या गोळ्या संबंधी मजकूर अगदीं खोटा आहे. आणि सर्व प्रकार बनावट व थट्टेतला आहे!

आंब्याच्या झाडास चिखल थापण्याच प्रकार खुद्द कलकत्ता शहरांतही सुरू झाला असें सांगतात.

बनारस येथील ९ व्या पलटणीच्या कांहीं शिपायांनीं तेथील व्यापाऱ्यांचीं कांहीं कापडांचीं दुकानें लुटलीं व त्यांत शिपाई व व्यापारी यांची एक लढाई होऊन २० व्यापारी अगदीं घायाळ झाले व त्यांतील २ जगण्याचीही आशा नाहीं असें समजतें.

गेल्या वर्षीं रंगून येथें जसा बकरीदच्या वेळीं हिंदुमुसलमानाचा दंगा झाला तसा दंगा यंदा होऊं नये, झाल्यास लागलींच गोळीबार सुरू होतील, वगैरे प्रकारची सरकारांतुन लोकांस समजुत मिळाली आहे.

दिल्लीस व त्याच्या आसपास पावसाळ्याचीं सर्व चिन्हें होऊन पाऊस पडला अशी बातमी आली आहे.

कांहीं विशेष प्रकारच्या गोष्टींचा विचार करण्याकरितां गव्हरनरजनरल लार्ड एल्जीन व काबूलचे अमीर यांची लवकरच एक समक्ष भेट होणार आहे असें सांगतात. विशेष गोष्टी कोणत्या हें बाहेर येण्याचें साधन नाहींच!

हिंदुस्थान व अफगाणिस्थान यांच्या दरम्यानची सरहद्द कायम करण्याची सर्व तयारी झाली. या कामाकरितां अमिराच्या तर्फेनें येणारा कामदार सरदार गुलमहमद हा इकडे येण्यास निघाला, पण वाटेंत गाड्या घोड्याची थोडी अडचण झाल्यामुळें दाखल होण्यास थोडा उशीर लागला आहे.

कुर्माखेडींत लष्करी लोकांकरतां नव्या इमारती बांधण्यासाठीं हिंदुस्थानसरकारानें १०,००० रुपये मंजुर केले आहेत.

उमराखानाची फौज हरणईच्या सरहद्दीवर आली असून काफर लोकांवर हल्ला करण्याच्या विचारांत आहे. हे काफर लोक चित्रळच्या ताब्यांतले असून चित्रळ हे इंग्रजी अमलांतलें आहे. लढाई सुरू होण्याची अगदीं तयारी दिसत आहे व ती सुरू झाल्यास त्या लढाऊ उमराखानाशीं सामना करण्याचें इंग्रज सरकारास भाग पडणार आहे. हा उमराखान काबूलचा अमीर व चित्रळ यांच्याशीं जरी वांकडा असतो तरी इंग्रजसरकाराशीं नेहमीं चांगल्या रीतीनें वागणार आहे.

काबूलचा अमीर येत्या वर्षीं इंग्लंडास जाणार असें ठरलें व त्या पूर्वीं गव्हरनरजनरल यांसही भेटणार. ठा. अ.

बंगाल इलाख्यांत मोठमोठ्या गांवीं आलीकडे दरोडे व मोठ्या चोऱ्या फार होऊं लागल्या आहेत. पोलीसाच्यानें यांचा बंदोबस्त करवत नाहीं. ह्मणून लोकांस आपल्या प्राणाच्या व वित्ताच्या रक्षणाची भीति पडली आहे असें समजतें.

म्यानचेस्टर हें समुद्राला लागून नसल्या मुळें व्यापारास अडचण होत होती ती दुर करण्याकरितां तेथून समुद्रापर्यंत नवीन मोठा कालवा खणून तयार केला व तो सुरू करण्याचा समारंभ महाराणी साहेबे यांच्या हातून २१साव्या तारखेस झाला.

अमीर साहेब विलायतेस जाणार असें ह्मणतात.

बंगाल्यांतील कांहीं भागांत दुष्काळ पडला आहे.

मकेंत वाखयाच्या उपद्रवानें फार लोक मरतात ह्मणून तेथें औषधपाण्याची नीट व्यवस्था राहण्यासाठीं टर्कीच्या सुलतानांनीं ३०,००० पौंड खर्च करण्याची परवानगी दिली आहे.

---

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८९० चा आक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

अर्जाचा नंबर २ सन १८९४

वर्ग १३

डिपुटी कामिशनर साहेब जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार दत्तात्रय, दिगंबर, जनार्दन व नरहरि बापाचें नांव अनंत जात ब्राह्मण, राहणार परतवाडा

वरील ( अज्ञान ) दिगंबर, जनार्दन, नरहरी बापाचें नांव अनंत जात ब्राह्मण राहणार परतवाडा तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यानें [ याच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावें ह्मणून ] अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचें आधारें किंवा दस्तैवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख ९ माहे जुलई सन १८९४ इ० रोजीं चिखलदरा अगर स्वारी असेल तेथें वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हाकिकत दाखल करावी.

तारीख १ माहे मे सन १८९४ इ०

C. E. Biddulph
Offg: Deputy Commissioner.
Ellichpur District.
दिस्ट्रीक्ट जड्ज्
जि० येलिचपुर.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन होतों तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणुन त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयी जाहीरात.

वर्ग १५ सन १८८९ आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. मु. नंबर ७

१८९४

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा येलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव अंग.

मर्द दतुजी गासीमाळी

राहणार नायगांव तालुके येलिचपुर

जिल्हा येलिचपुर यांस मयत

दतुजी बापाचें नांव श्रावण माळी राहणार नायगाव तालुकें येलिचपुर जिल्हा येलिचपूर यांचें कर्ज वसूल करीतां येण्या साठीं सरठीफिकीठ मिळावें म्हणुन सदरहु अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करीतां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख ६ माहे जुलई सन १८९४ इसवी रोजी सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २४ माहे येप्रील सन १८९४ इ.

C. E. Biddulph
Offg: Deputy Commissioner.
Ellichpur District.
दिस्ट्रीक्ट ज्यड्ज्य
जि० येलिचपुर.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. मु. नंबर ९

१८९४

वर्ग १९

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हे एलिचपूर यांचे कोर्टांत

नांव सुभानखां

जवर्न तानमहमद

राहणार परतवाडा तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांस मयत.

तानमहमद बापाचें नांव सेखअहमद राहणार परतवाडा तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावे ह्मणून सदरहु अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणुन ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख ४ माहे जुलई सन १८९४ इसवी रोजी स्वारी असेल तेथें सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी.

तारीख १३ माहे मे सन १८९४ इसवी.

C. E. Biddulph
Offg Deputy Commissioner.
Ellicpur District.
डिस्ट्रिक्ट ज्यड्ज्य
जि० एलिचपूर

---

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancel'ed Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Criminal matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

---

हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

☞ पुरवणी पहा.

नोटीस.

रा. रा. धोंडीसा नारायणसा लाड मयत वारस वहिवाटदार गोपाळसा रामुसा, गणुसा वा धोंडीसा लाड दुकान कजबे डोणगांव ता. मेहेकर यांस.

खाली सही करणार रामपुरी गुरु शिवरामपुरि गोसावी अज्ञान पालन करणार हनमंतपुरी वा भिकापुरी गोसावी राहणार कजेब डोणगांव तालुके मेहेकर जील्हा बुल्डाणें यांज कडून नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं आमचा गुरु नामे सिवरामपुरी गोसावी याचे हस्ते तुमचे दुकानी रकम रुपये ७०० आक्षरी सातसे लिके सुर्ती जमा आहेत. ते रुपये व आमचे गुरू शिवराप पुरी हे मरण पावल्या वेळीं आह्मी घरी नसल्याचे योगानें चपार पंचानी घरातील इस्टेटी पैकी कांहीं रोकड व सोनें कोणी जवळ सांभाळणारा नसल्यामुळें तुमची लायकी व आब्रू पाहुन रोकड रुपये ६४३ साहासे त्रेचाळीस व सोनें ३३ तेहतीस तोळे. तुमचे दुकानी अनामत ठेविलें अहेत.

शिवरामपुरी यांचे एकंदर इस्टेटींचा मी त्यांचा शिष्या असले योगानें पूर्ण मालक आहे स्थावर जंगम इस्टेटे वारसाचे नात्यानें माझे ताब्यात आहे. कजबे डोणगांव येथील संस्थान इनामी जमीन व दुसरे नंबर व कसबे वाकद तालुके वाशीम ऐथील संस्थान व इनाम जमिन वारसाचे नात्यानें माझे नांवे झालेली आहे. शिवाय शिवरामपुरी यांचे मालकीचे देण्या घेण्या संबधी कागदपत्र व इतर कागदपत्र माझेच स्वाधीन मालकीच्या नात्यानें आहेत. ही एकंदर हकिकत तुह्मी गांवचेच राहणारे असल्या वरून तुह्मास विदीत आहे. मी लिहून कळवावे असें नाहीं वरील आमचे गुरू शिवराम पुरी यांचे नांवें जमा असलेलें रुपये ७०० सातशे व रुपये जमा झाले मिती पासून आज मिती पावेतो दरमहा दर शेकडा ०१२ बारा आणे प्रमाणें व्याज व शिवरामपुरी यांचे मरणा समयीं ४ चार गावांतील कसबे मजकूर येथील लोकांनीं व त्या वेळेस इतर गावांतील हजर असलेले रुम्प लोकानीं आनामत ठेवलेले रुपये ६४३ साहासे त्रेचाळीस एकूण रुपये १३४३ तेरासे त्रेचाळीस व व्याज शिवाय सोने ३३ तेहतीस तोळे हे आपणांस मागत असतां आपण विनाकारण चाळवा चाळवी मांडली आहे व भलभलत्या सबबी दाखवितां हे तुह्मा सारख्यास शोभत नाहीं तुमचा आमचा आजपर्यंत एक सारखा प्रेम चालत आला आहे. त्याप्रमात अंतर पडुनेय ही उमेद आहे. आतां ही नोटीस पावल्या तारखे पासून ८ आठ दिवसांत वरील दर्शविलेली रक्कम व व्याज व सोनें आमचें आह्मास देऊन आमची पावती घ्यावी. मुदती प्रमाणें तुमचे कडून घडून न आल्यास मग आह्मास कायदेशीर इलाज करावा लागेल. आपणास कोर्ट खर्च व या नोटीसाचा खर्च व आमचे रुपये व सोनें आह्मास मिळे पावेतो जें कांहीं नुकसान होईल व खर्च होईल त्या सर्वांबदल तुह्मास जबाबदार धरलें जाईल. असा प्रसंग न यावा व आपण्ही लायक मनुष्य आहात. असा प्रसंग आपणही आणणार नाहीं ही पूर्ण खात्री आहे. सुचना करितां अगाऊ या नोटीसीनें जाहिर केलें आहे. कळावें तारीख १ माहे जून सन १८९४ इ०

( सही )

रामपुरी गुरु शिवरामपुरी गोसावी आज्ञान पालन करणार हनमंतपुरी वल्लद भिकापुरी गोसावी राहाणार कजबे डोणगांव तालुके मेहेकर जिल्हे बुलढाणें यांचे हातची निशाणीची रेघ.

## सहविचारिणी सभेची ग्रंथमाला.

( पुस्तक ४ थें )

## विलासिनी.

ही कादंबरी रा. रा. रामचंद्र आबाजी राने यानीं सुमारें वीस वर्षांपूर्वीं छापून प्रसिद्ध केली होती, व त्या वेळीं यांचा हा पहिलाच यत्न होता, तरी त्यांच्या या कृतीबद्दल रा. रा. वामन अबाजी मोडक बी. ए. आबाजी विष्णु काथवटे बी. ए. महादेव चिमणाजी आपटे बी. ए. एल्. एल्. बी. इत्यादि विद्वान् गृहस्थांनीं आपले अभिप्राय बरेच अनुकूळ प्रकट केले होते. प्रस्तुत ग्रंथकार हे दीर्घोद्योगी असून या कादंबरी ग्रंथाशिवाय अन्य तऱ्हेनेंही महाराष्ट्र भाषावाचकांस अपरिचित आहेत असा मुळींच प्रकार नाहीं. सुमारें १५ वर्षांपूर्वी पुणें येथें कै० रा. ब. गोपाळराव हरि देशमुख इत्यादि सद्गृहस्थांच्या यत्नानें "ग्रंथाेत्तेजक मंडळी" स्थापन झाली होती, त्या वेळीं त्या सभेच्या पुस्तकमालेंत या ग्रंथकर्त्यांचें "कृषिकर्मविद्या" या नांवाचें पुस्तक छापून प्रसिद्ध झालें होतें. हल्लीं ग्रंथकारांनीं आपल्या प्रथमच्या ग्रंथलेखनप्रयत्नांत घडलेले दोष दूर करून "विलासिनी" कादंबरी अगदीं नव्यानें लिहिली आहे, व तींत भाषा, संविधानक इत्यादिकांसंबधानें पुष्कळ महत्वाचे फेरफार केले असून सांप्रतचें पुस्तक पूर्वींच्या पुस्तकाच्या मानानें विशेष योग्यतेचें झालें आहे. ही गोष्ट हें पुस्तक सहविचारिणी सभेपुढें ग्रंथकारांनीं वाचण्यापूर्वीं त्यांना बऱ्याच सद्गृहस्थांकडून मिळालेल्या अभिप्रायावरून सहज व्यक्त होणार आहे.

अष्टपत्री सांच्याचीं सुमारें २५० पृष्ठें होतील. खालीं सह्या करणार ह्यांच्याकडे रोकड वर्गणी अगर खात्रीलायक सह्या मे सन १८९४ अखेरपर्यंत देणारांस टपाल हंशील-शिवाय इंग्रजी नाण्याचा १ रुपाया पडेल. पुस्तक जून सन १८९४ अखेर बिनचूक बाहेर पडेल. पुस्तक फार सुरेख छापलें जाऊन थोडक्या पानांत पुष्कळ मजकुराचा समावेश होईल. तशीच बांधणी ही फार सुरेख केली जाईल. अगाऊ आश्रयदात्यांचीं नावें पुस्तकाच्या शेवटीं छापलीं जातील बारा ग्राहक मिळवून देणारांस १ प्रत फुकट मिळेल.

बडोदें तारीख २४-११-९४ } शंकर मोरो रानडे बी.ए. भानु केशव गांगनाईक सहविचारणीसभेचेचिटणीस.

नोटीस

ती० महादु वा इण्णाजी तेली राहणार नबाबपुरा प्रां व तां आकोला जिल्हा मजकूर यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आणि मी आज पावेतो एक ठिकाणी होतो व एकत्र असल्यामुळें तुह्मी व मी लहानपणा पासून आजपावेतों दोघांनीं कष्ट करून जी स्थावर व जंगम जिनगी संपादन केली ती समाईक आहे. आतां तुमचे व आमचे आपसांत बनत नसल्यामुळें तुमचे मध्यें राहाण्याचा माझा मानस नाहीं ह्मणून तुह्मास नोटीस देतो कीं जी स्थावर जंगम जीनगी समाईक आहे ती नोटीस पावताच मजला समभाग वाटून माझे पदरांत घालावी जी माझी निम्मे हिश्याची स्थावर इस्टेट आहे ती मी आकोल्या ताजना पेठेंतील रा. रा. गोविंदराव श्रीमंत रा. रा. बाबुरावजी देशमुख यांचे एजंट याना रुपये २३०० मध्यें खरिदी देऊन नेंदून दिली आहे व ती रक्कम तुमचे व माझे समाईक जे सावकार आहेत त्यांना निमें भाग कर्जाचा अदा करण्यास व बाकी राहील ती मजला माझे कुटूंबाचे व माझें उपजिविके करितां असें केलें आहे. तर या दोन महिन्याचे पूर्वीचे जे सावकार समाईक उभयतांचे आहेत यांनीं निमें भाग कर्ज द्यावें व दोन महिन्याचे मध्यंतरीं जें कर्ज तूं काढलें असतील त्याचा हिशेब दाखविल्या शिवाय मी कर्ज देणार नाहीं. ज्याना मी खरिदि खत करून दिलें आहे त्याना तुह्मी मनाई करूं नये. मनाई केल्यास मी तुमचेवर दिवाणींत नालीश करून सर्व जिनगीचा निमे भाग खर्चा समेत भरून घेईन हीं नोटीस दिली सही तारिख ४-६-९४

सही

परशराम वा॥ इण्णाजी तेली निशाणी खुद्द.

## सर्व इंडियन लॉ रिपोर्ट १८९३ यांतील

## फौजदारी टरावांचे मराठी भाषांतर-

कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद आणि मुंबई ह्या चारही हायकोर्टापर्यंत जे फौजदारी खटले गेले त्यांपैकीं सुमारें ८० खटले चारी हायकोर्टांचे १८९३ चे इंडियन ला रिपोर्टस मध्यें इंग्रजींत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचें मराठी भाषांतर आजपर्यंत झालेलें नाहीं. ते खटले भाषांतर होऊन आपल्यास वाचण्यास मिळाल्यास आपला फार फायदा होईल असें कित्येक केवळ मराठी जाणणारे माजिस्त्रेट, वकील, मुकत्यार, फौजदारीकडे काम करणारे कारकून व पोलिस खात्यांतील लोक यांनीं खालीं सही करणारास कळविल्या वरून त्यांनीं हें काम हातीं घेतलें आहे व येत्या जून अखेर हें भाषांतर संपेल व जुलई महिन्यांत तें छापण्यास आरंभ केला जाईल व जुलई अखेर पुस्तकें तयार होतील. रायल साईजच्या चतुष्पत्री सांच्याचें तें छापावयाचें आहे व त्याचीं सुमारें ४०० पासून ५०० पृष्ठें होतील. ज्यास हें पुस्तक पाहिजे असेल त्यानें ता० ३० जून १८९४ चे आंत खालीं सही करणारास लिहावें ह्मणजे नांवें नोंदून पुस्तकें तयार होतांच पाठविलीं जातील. ज्या कडून ता० ३० जून १८९४ च्या आंत कळविलें जाणार नाहीं त्यास खात्रीनें पुस्तक मिळेल असें नाहीं. कारण ३० जून च्या आंत नांवें कळविलीं जातील त्या मानानेंच पुस्तकें काढण्याचा विचार आहे.

या पुस्तकाची काय किंमत पडेल हें ह्यापुढें दर्शविलें आहेः—

( १ ) ता० १ जुन आगाऊ किंमत देणारांस टपाल हशीलसह ३८ पडतील.

( २ ) फक्त सही देऊन व्ह्याल्यूपेएबल मागविणारास ४८ पडतील.

( ३ ) पुस्तक तयार झाल्यावर घेणारास ५८ पडतील व पुस्तक असल्यास मिळेल.

जे लोक हल्लीं दरबारी पत्राचे वर्गणीदार आहेत त्यांनीं ता० ३१ मे १८९४ चे आंत अगाऊ कळविल्यास ३८ रुपयांस हे पुस्तक मिळेल व त्याकडे हें पुस्तक व्ह्याल्यूपेएबल करून पाठवून हे रुपये वसूल केले जातील. ता० ११ एप्रिल १८९४ इ०

वामन गोविंद रानडे,
वकील व दरबारी कर्ते
बारामती जिल्हा पुणें.

## जाहिरात.

खाली सही करणार याज कडून जाहीरांत देण्यात येतें कीं माझा भाऊ महादु वा॥ इण्णाजी व मी असे आजपावेतो समाईक एके ठिकाणी होतों व त्या मुळे त्याणी व मी असे लहाण पणा पासून जी स्थावर व जंगम जीनगी संपादन केली आहे तीचा नीमे भाग मी गोविंदराव याना विकला आहे त्यांचे कबजांत दिला आहे. आता जाहिरात देतो कीं माझे भावाजवळून कोणीही सावकारानीं व आप्तस्नेयेरे भाऊबंद याणीं कोणतेच प्रकारचा त्या जीनगीची खरेदि, गहाण वगैरे करून घेऊं नये आणि घेतल्यास तो बातल समजला जाईल ही जाहीरांत दिली सही ता० ४-६-९४

( सही )

परशराम वा॥ इण्णाजी तेली निशाणी खुद्द हातची असे.


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी- ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व '६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें स्विसपांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जारत काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असे वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता-
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

सालअखेर " ७ " १८
किरकाळ अंकास ...................८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०।

Six monthly............3 " 8 as.
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

THE BERA SA MACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 18 JUNE 1894 NO 24

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १८ माहे जून सन १८९४ इ० अंक २४

## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा?

एका गृहस्थास त्याच्या धर्मवेडामुळें एका जुलमी सरकारानें कारगृह दाखविला. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत रहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघली आणि सहा फूट उडी जमीनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या विचाराची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक. त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रुपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेलें आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेलें ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घट्ट बेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाइकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरप ( माता शिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्या मुळें मी तें औषध घेण्यास सुरु केलें. मी थोडं थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें. आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत नेहल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं, ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळीनें दुसरे नांना उपाय करून थकले व जेव्हां ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे माता सिजलच्या पाकाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसीस ) एम वार्ड
१९४ इकसटन रोड
शडफर्ड नोटिंगहाम
ता. १ ली माहे एप्रिल सन १८९२

मिसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगापासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा काळ सतत शारिरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता ही सूर्य प्रकाशासारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखा पसरते तद्वत ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व ती दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पक्वाशय पिंडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतली सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणा मुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरीरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जें औषध सांगतें त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठमोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुंहेत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरुकिल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सर्टीटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखावरून समजेल. H. D.

---

### नोटीस

ती० रा० रा० सिवरामजी वल्लद भिवसनजी पाटील राहाणार देऊळगाव परगणें पणज तालुके आकोट यांस नोटीस देणार चहादुजी वल्लद भिवसनजी पाटील राहाणार देऊळगाव परगणे पणज ह्या नोटीसीने असें कळवितो कीं तुम्हांस पुत्र नाहीं व तुम्ही दत्तक मुलगा शंकर वा॥ रावजी गांवंडे खले दुसरी पैकी यांचा घेणार आहा असें कळलें. यांज करितां तुम्हांस ह्या नोटीसीनें असें कळवितों कीं आमच्या घराण्यांत जें पाटीलकीचें व पांडेपणाचें वतन आहे त्यास कायद्या प्रमाणें. व धर्म शास्त्रा प्रमाणें आमच्या मुलाशिवाय दुसऱ्याच्या घराण्यांतील मुलगा तुम्ही घेणें बरोबर नाहीं. याज करितां तुम्हांस नोटीसीनें कळवितों कीं तुम्ही समजुन उमजुन आपल्या घराण्याच्या संततीचें नुकसान करूं नये. मी माझ्या मुलापैकीं जो मुलगा तुम्ही मागाल तो देणेस तयार आहे हें तुम्हांस कळावें म्हूणन दिली नोटीस सही ता० ११।६।९४ इ०

( सही )
चहादुजी वल्लद भिवसनजी
पाटील दस्तुर खुद.

---

### घड्याळ.

कि. रुपये ६ हमी– ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व '६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मागरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

---

### विजयादशमीचें सोनें

ODE ON THE POETS

Bards of Passion and of Mirth
Ye have left your souls on earth!
Have ye souls 'in heaven too,
Double-lived in regions new?
—Yes, and those of heaven commune
With the spheres of sun and moon;
With the noise of fountains wonderous
And the parle of voices thunderous
With the whisper of heaven's trees
And one another, in soft ease
Seated on Elysian lawns
Broused by none but Dian's fawns;
Underneath large blue-bells tented,
Where the daisies are rose-scente l,
And the rose herself has got
Perfume which on earth is not;
Where the nightingale doth sing
Not a senseless, tranced thing,
But divine melodious truth;
Philosophic numbers smooth;
Tales and golden histories
Of heaven and its mysteries.

( दों दिवसाची तनु हे साची या चालीवर )

भावरसाकुल काव्य मनोहर मानसवृत्तिस जें खुलवी॥
चैतन्याचि हें काय आपुलें ठेवूनि येथें लाय कवी॥ [illegible] खरे ॥ ध्रु ०॥
परत्र वसती; दुसरा आत्मा तुम्हास तेथें काय असे;
चैतन्यरूप खचित तुम्हा ( मग धन्य न कावि या जगीं कसे ! )॥ १ ॥
चंद्रलोक रविलोक ही तुमचा आत्मा कुतुकें हिंडतसे;॥
निमिल - जल - झर - मंजु - रवानें - अद्भुत - दुखभर सेवितसे ॥ २ ॥
विद्युद् भैरव रव वा पादप मर्मर तेथें स्वस्थ मनें ॥
सेवन करिता; परस्परांशीं गोष्टी वदता सहजपणें ॥ ३ ॥
कौशिक मृदुतृण धीकावरि वा निद्र करितां सुखशयनीं॥
वास्तव मृग शिशु स्वच्छंदानें चरती भयलव जेथें त्यजुनी ॥ ४ ॥
कांचन चंपक च्छाये खालीं सदा फुलील गंध अहा ! ॥
जुइचा, जुईला गंध असे जो दृष्टिस न पडे महिवर या ॥ ५ ॥
दिव्य मनोहर सुस्वर सार्थक बुलबुल रव हा मधुर पहा ! ॥
चर्पटपंजरी गात नसे खग तेथें जैसा महिवर या ॥ ६ ॥
तत्व सुधारस—पान सदां ज्या सरसोत्तम तें काव्य नवें ।
कथेतिहास ब्रह्मरहस्याहि बुलबुल गाते मधुर रवें ॥ ७ ॥
ऐसें अंबरिं वसता महिवरि काव्यात्मा तव यश पिकवी ।
दुःखासारुनि सत्य दावी सत्वबीज तों मग शिकवी ॥ ८ ॥
भावरसाकुल काव्य ॥ कवि धन्य खरे ॥ ध्रु० ॥

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य १५ शके १८१६

हल्लीं पौंडाचा भाव फार चढला असल्यामुळें सोन्याचा भाव चांगला येत आहे ह्मणून पुष्कळ लोक आपल्या जवळील सोनें विकण्यास काढीत आहेत. व इंडियांतून सोन्याचे गठ विलायतेस रवाना होत आहेत. सोनें देशाबाहेर पुष्कळसें गेलें ह्मणजे हुंडणावळीचा भाव उतरेल असें कित्येक विद्वान ह्मणतात पण तें ह्मणणें आमच्या विचारास जुळत नाहीं. गेल्या ८ वे तारखे पर्यंत पंधरा दिवसांच्या मुदतींत ४८ लक्ष रुपयांच्या किंमतीचें सोनें आगबोटीनें द्वीपान्तरीं धाडण्यांत आलें. आणि हा आंकडा चालूं तारखेपर्यंत एक अगर सव्वा कोट रुपयांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. पौंडाचा भाव नाण्याच्या कायद्यानें वाढत चालला आणि या कायद्यानें या देशाचें अत्यंत नुकसान झालें. हा कायदा तसाच चालूं ठेविला तर सरकारच्या खजिन्यांत केवढी मोठी तूट येईल याचा नेम नाहीं. काम्पेनसेशन अलावन्स लष्करी अवाढव्य खर्च, विलायत सरकारचे होम चार्जीस पौंडाच्या नाण्यामध्यें दिलीं जात असलेलीं पेनशनें इत्यादि सहस्त्रावधि खर्चाच्या तोंडांनीं या देशाच्या खजिन्याला ओहटी लागली आहे. जकातीचा कायदा करून हा सर्व बोजा लोकांवर लादला गेला तथापि पैशाची तूट भरून येण्यासारखी नाहीं. ह्मणून आणखी निराळे कर बसतात कीं काय अशी दहशत पडली आहे. खर्चाच्या बाबी कमी केल्या शिवाय पैशाची तूट नाहींशी होणार नाहीं पण सरकारला हा उपाय इष्ट वाटत नाहीं हें आमचें दुर्भाग्य होय !

परकीय राष्ट्राचा राज्यकारभार किती अहितकारक, धननाशक, व दास्यत्वप्रद होतो याचें उत्कृष्ट उदाहरण झटलें ह्मणजे आमच्यावरील इंग्रजी राज्य होय. इंग्रजी राज्याची दिगंत कीर्ति पसरली आहे कीं न्याय प्रजेला सत्वर व चांगला मिळतो, वित्त, व प्राण यांचें संरक्षण उत्तम होतें, विद्येच्या प्रसारामुळें लोकसमूह कर्तव्यदक्ष, कलानिपूण व सुधारलेला असा होत चालला आहे. या गोष्टी अक्षरशः खऱ्या आहेत आणि त्या राज्यकर्त्यांच्या उदार राजनीतीची, परहितबुद्धीची, व स्वतंत्र विचाराची साक्ष देतील. किंबहुना असेंही ह्मणतां येईल कीं पृथ्वीवरील कोणतेंही अन्य राष्ट्र या देशास इतकें कल्याणकारक झालें नसतें आणि सांप्रतची स्थिती तर सांगते कीं हिंदुस्थानाला इंग्रजी राज्य शिवाय गत्यंतर नाहीं आणि इंडिया व इंग्लंड या उभय देशांचा ऱ्हास व उत्कर्ष एकाच गोष्टीनें होईल. राज्यकर्ते व नेटिव प्रजाजन या दोहोंचें संमेलन सर्व राजकीय प्रकरणांत झालें पाहिजे आणि भेदाभेद, आपपरदृष्टी, व स्वार्थपरायणता इत्यादिकांना राज्यकर्त्यांनीं तिलांजली दिली पाहिजे.

आह्मी राजनिष्ठ राजभक्त, व देशाभिमानी आहों, आणि इंग्रजी राज्याखालींच आह्मी आपला देश वैभवशाली करूं इच्छितों ह्मणून आमचे डोळे राज्यकर्त्यांच्या दोषाकडे अगोदर जातात. राजनीति चुकली तर त्यांत उभय राष्ट्रांचें अकल्याण आहे ह्मणून आह्मी सरकारचे दोष वारंवार व्यक्त करून दाखवीत असतो. इंग्रजी राज्य इतकें वर्णनीय, न्यायमार्गी, व उदार तत्वानुवर्ती आहे तथापि देशाच्या संपत्तीच्या दृष्टीनें मुसलमानी राज्यापेक्षां वाईट आहे. परराष्ट्रीय राज्यकारभाराचें मूळ अवलक्षण हें कीं देशांतील संपत्तीचे झरे राज्यकर्त्यांच्या देशांत वहूं लागतात. ज्या धनोत्पादक गोष्टी त्या परकीय राष्ट्रांत उत्पन्न होतात आणि ज्या धनहारक गोष्टी त्या इंडिया सारख्या देशांत विपुल दृष्टीस पडतात. शेतीवाडी व किरकोळ उद्योग सुधारले असतील परंतु त्यांचें प्रमाण विलायतेहून इकडे येऊन खपणाऱ्या मालाशी अगदी थोडें आहे. अप्रतिबंध व्यापाराचे तत्वाचा फायदा सर्वोपरीनें विलायतच्या लोकांस मिळतो. समसमान तोलाच्या राष्ट्रामध्यें हें तत्व नीट आहे परंतु हिंदुस्थान देशानें विलायतेशीं व्यापारांत टक्कर मारणें ह्मणजे पंगु ठेंगण्या व लुळ्या मनुष्यानें धष्ट्या कट्ट्या, धिप्पाड व तालिमबाज मनुष्यांशीं बाहुयुद्ध खेळण्या सारखें आहे. व्यापार, चाकरी, वगैरे गोष्टींत आमचा पाय खोलांत आहे. आणि त्या शिवाय परराष्ट्रीय राज्यकारभारानें तर आमची स्वतंत्रता नामधारी करून सुधारलेल्या गुलामगिरींत आह्मास लोटून दिलें आहे. ईश्वर करो आणि आमच्या राज्यकर्त्यांस सद्बुद्धि होवो ! इंग्लंड व इंडिया हीं दोन्हीं राष्ट्रें सर्व प्रकरणांत एकजीव व सारखीं हक्कदार झालीं पाहिजेत. एवढाच एक आह्मास तरणोपाय दृश्यमान आहे.

### मे. एटकीन साहेबांचें प्रयाण

( सार्वजनिक निरोप )

गेल्या सोमवारीं सायंकाळीं येथील टाऊन हालांत एक अत्यंत प्रेक्षणीय, हृदयंगम व अपूर्व पानसुपारीचा समारंभ पहाण्यांत आला अखिशान रेसिडेंटा सारख्या बड्या पाहुण्यांच्या निमित्त अशा दरबारचे प्रसंग अनेक वेळा घडतात परंतु त्या मध्यें आणि गेल्या समारंभा मध्यें वैचित्र्य इतकेंच कीं मे. एटकिन साहेबांना आदर सत्कार करण्याकडे त्यांचा छात्रसमूह, स्नेहीवर्ग व इतर शिष्ट जन यांची पूज्यबुद्धि, अध्यापन प्रेम व गुणग्राहकता हीं पूर्णपणें दिसून आलीं. मे एटकीन साहेब पगारानें व दर्ज्यानें साधारण अधिकारी होते तरी त्यांची शिक्षणपद्धती नेमस्तपणा, सरल व चोख वर्तन, निस्पृह व बाणेदार स्वभाव इत्यादि गुणसमुच्चया मुळें ते लोकमान्यतेस व कृतज्ञतेस पात्र झाले होते. राजकीय प्रतिबंधक नियमा मुळें सरकारला यांना शाळाखात्याचे मुख्य अधिकारी कायमचे नेमतां आलें नाहीं हा यांच्या चरित्रांतील खेदकारक दुर्योग खरा परंतु त्या मुळें त्यांची किंमत यत्किंचितही कमी वाटली नाहीं.

सभेच्या दिवशीं सभास्थान फार सुशोभित व रमणीय दिसत होतें. पोलिसचा बँड व रोषनाई यांनीं विशेष मौज आणली. निमंत्रण केल्या प्रमाणें गावांतील व बाहेर गांवचे प्रमुख लोक शेकडों जमले असून सभागृह अगदीं गजबजून व दणाणून गेलें होतें. अध्यक्षस्थानीं मि. हेअर साहेब होते. सभेच्या कामाला येथील होतकरू, विद्वान व तरतरीत वकील रा. रा. नारायण काशीनाथ दाते यांनीं इंग्रजी भाषणानें सुरुवात केली. त्याचें बोलणें व्यक्त, सुरस व मनोवेधक झालें. त्यांच्या अर्ध्या तासावर अस्खलित चाललेल्या भाषणाचा मथितार्थ असा कीं मे. एटकीन साहेब यांनीं वऱ्हाडच्या प्रजेवर परोक्ष व अपरोक्ष रित्या फार उपकार केले आहेत व त्यांचें अशा सार्वजनिक प्रसंगानें दिग्दर्शन करून थोडे उतराई व्हावें हें साहजिक व उचित आहे. त्यांच्या सर्व बोलण्यांत मे. एटकिन साहेबांच्या मनाची व गुणाची योग्यता स्पष्टपणें दाखविली असून सद्गुणांचें प्रतिबिंब विद्यार्थ्यांमध्यें किती नामी उतरलें आहे हें सांगण्यांत आलें. शिक्षकाच्या कामाची मातबरी मे. एटकीन यांनीं स्वतांच्या उदाहरणानें चांगली जाणवून दिली. राजश्री दाते यांच्या मागून रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांचें भाषण झालें. हे चांगले वक्ते असल्यामुळें यांच्या रसाळ वाणीनें व मराठी बोलीनें कर्तव्यतत्परतेचे महत्व मि. एटकीन यांच्या चरित्रावरून अगदीं स्पष्टपणें कळलें. त्यानंतर मे. एटकीन साहेब सद्गदित अंतःकरणानें उत्तर दाखल बोलले. आयुष्यांतील खऱ्या सौख्याची गुरुकिल्ली सांगतांना त्यांचा उपदेश फारच फार लक्षांत ठेवण्या सारखा वाटला. आबालवृद्धांस तो सारखाच लागू पडेल. वक्त्याची विद्वत्ता विचार स्वातंत्र्य, व अनुभव यांची प्रतिमा त्या भाषणांत चांगली उमटली होती. नंतर मे. हेअर साहेबांनीं मि. एटकीन यांची तसबीर मोठ्या आनंदानें खुली केली आणि हार तुरे अत्तर गुलाब वगैरे वाटल्यानंतर सभा बरखास्त झाली.

येथें एक सन्यासी गेल्या मंगळवारीं सायंकाळीं निवर्तले. त्यांचा अंतकाळ जवळ आला हें पाहून त्यांच्या नातलगांनीं त्यांस समाधिस्त झाल्यावर मूठमाती देण्याचा परवाना मिळावा म्हणून मुनसिपालिटीस अर्ज केले. सन्यासी पुरण्याची वहिवाट गांवा बाहेरील मैला गाडण्याच्या जागेच्या पलिकडे आहे. तेथें सन्यासी पुरण्यासाठीं प्रास्तविक अर्ज करण्याची कायद्यानें जरूरी नाहीं. परंतु अर्ज सादर झाल्यावर स्यानिटिंग कमिटीनें असा हुकूम फर्माविला कीं पुरण्याचा खळगा ६ फूट खोल खणून तो ओंड चुनेगच्चीनें बांधून काढावी. हें काम विशेष खर्चाचें असल्या मुळें सन्याशाचे गरीब नातलगांस बरीच काळजी उत्पन्न झाली. मुनसिपालिटीच्या आग्रहाच्या पण आरोग्य रक्षक हुकूमाची अंमलबजावणी होऊन पुढील अशा प्रसंगास असाच कडक हुकूम लागू होऊ नये म्हणून लोकांनीं वर्गणी देण्याचें नाकारलें. प्रेताला दुसरा दिवस म्हणजे बुधवार उजाडला परंतु मुनसिपालिटी आपला आग्रह सोडीना आणि प्रेत हालविता येईना. शेवटीं आमच्या गांवचे बाणेदार वकील रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं मे. हेअर साहेबाकडे जाऊन म्युनिसिपालिटीच्या हुकूमाच्या बेशिस्त, व जुलमी कडकपणा विषयीं खात्री केली असें बोलतात मे० हेअर साहेब व व्हाइस प्रेसिडेन्ट यांच्या मध्यें कांहीं पत्रव्यवहार होऊन शेवटी व्हाईस प्रेसिडेन्ट राव साहेब देवराव विनायक यांनीं दुसरा अर्ज घेऊन रिती प्रमाणें व्यवस्था करण्यास सांगितलें, आणि कांहीं मालमसाल्याची मदत प्रेत पुरण्यासाठीं स्वतांच्या खर्चानें दिली या बद्दल सन्याशाचे नातलग रावसाहेबांचे ऋणी राहतील. या बद्दलची सात्र हकीकत पुढील अंकीं कळविल्यावर मुनसिपालिटीच्या नव्या वाईट हुकुमाची शहानिशा लोकच ठरवितील म्हणून आम्ही सध्या विशेष लिहीत नाहीं. या बाबतींत मेहरबान हेअर साहेब यांनीं सार्वजनिक आरोग्याच्या गोष्टी न विसरतां लोकांच्या वाजवी हक्का कडे लक्ष्य देऊन त्यांचें गाऱ्हाणें समंजसपणानें ऐकून घेतलें आणि योग्य न्याय करविला या बद्दल त्यांची स्तुती करावी तेवढी थोडीच आहे.

गुणी व परोपकारी मनुष्याची संगती थोडा वेळ घडली तरी त्याच्या चांगुलपणाचा प्रभाव लोकांच्या नजरेस आल्या शिवाय रहात नाहीं. हल्लीं या जिल्ह्यांत सिव्हिल सर्जनचे जागीं असलेले डाक्टर मारिसन हे आपल्या उत्तम वैद्यक्रियेनें लोकांस फार प्रिय झाले आहेत. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ, गरिबा विषयीं दयार्द्र व रुग्ण जनाच्या सेवेंत तत्पर असा आहे. रोगी गरीब असला तर ते घरीं फी शिवाय जाऊन योग्य औषधोपचार करितात. डाक्टर रेली यांच्या तीन महिन्यांच्या रजे मध्यें हे येथे आले आहेत तथापि त्यांची कायम नेमणूक येथेंच व्हावी असें लोक इच्छितात. युरोपियन लोकांत नेटिवा विषयीं असें आस्थेवाईक व कळकळीचे डाक्टर क्वचित् आढळतात !

The Berar Samachar

MONDAY JUNE,

18 1894

### A PUBLIC FAREWELL

The Eleventh of June will long be remembered in this town. Inspite of the jealous detractors of a worthy man, the public of Akola bade farewell to "a man severe he was and stern to view," and "yet he was kind. or, if severe in aught, the love he bore to learning was in fault." The time fixed for the commencement of the proceedings was 6: 30 P. M. The rains had been busy as if to cool down the indignation of the people aroused by the foulness of only one m... manifested perhaps to please some of h... patrons! The rains perhaps fell so heavily from an hour before noon to about three in the afternoon to wash off the impurities occasioned by one single soul! Whatever it be, people were anxious, lest the heavy and continued rainfall might prevent the flower of the town from exposing themselves in the chill and heavy showers! So great was the enthusiasm of the people in bidding adieu to and in meeting Mr. G. C. Aitken perhaps for the last time that the Town Hall was over crowded at about 5 in the afternoon. All public servants in the public offices most of whom have been instructed and moulded by the friend who has now left us hastened to the place before that time. Men from Malkapur, Amraoti, Burhanpur and several other places were also to be seen. Police Band was also present. More than two hundred persons were in the compound. Admis-

sion has to be stopped. Mahomedans, Hindus, Christians, Parsis &c. all influential and learned were present before the time fixed, when G. C. Aitken Esq. arrived accompanied by R. D. Hare Esq. Raosahibs Deo Rao Vinayak and Patwar—dhan the D. P. L. and all other Native and European officers being at the steps. Mr. Aitken was led to the dais and the Band was playing National Anthem. All having taken their seats, Mr. Narayan Kashinath Date B. A. a rising pleader of the Local bar sufficiently known to our readers addressed the meeting. Mr. Date's speech was a master piece in itself. It was well worded, earnest, eloquent, and thrilling. It appeared that he wanted to speack much more. But time and occasion must have forced him to curtail a deal of what he would have said. As we propose giving his speech *in extenso* in our next issue we shall barely confine ourselves to our estimate of the same. The speech particularly delighted us as being un—precedented and almost the first of its kind. It aimed at no invidious comparisons. It was bold, vigorous, and manly. It was full of literary and philosophical reflections. The speaker who addressed two out of the three farewell meetings the Public held was absent from this town. The charge therefore devolved on Mr. Date and he has most creditably acquitted himself of it. His speech was in English But it was most delightful to the people. He was cheered all through.

Then followed the speech of Mr. Vyankat Rao Desai in Marathi. No selection could have been better. In Mr. Vyankat Rao we had a twofold interest. As a pupil of Mr. Aitken, his case is very unfortunate. Yet as an honest gentleman, capable of reason and generous enough to openly acknowledge the change of opinion wrought in him, he came forward at the request of the public of course to address the meeting. His fluency and delivery were greater than Mr. Date's, His speech was even more impressive than the preceding. The points he dwelt upon were well chosen. His speech may be briefly summed up in the following lines;—"I am no longer a student. I speak as a public man of 20 years' experience. Mr. Aitken has been unjustly ignored. It is our duty to do honor to a genuleman who has without any appreciation from his authority worked so honestly, and zealously among us, and for us for over 27 years. His independence of character, his straightforwardness, his silent but earnest interest in natives his retired habits, his unassuming manners to a fault and therefore opening the vile mouths against him and above all his most exemplary character, judgment, and appreciation will even though he be far off from us will for nearly half a centuary deeply mould our character and mind, as he has hitherto done. He may have erred and who does not? But we are to look to his spirit and motives. It is human honor we must prefer to substantial emolument. If the Government do not substantially reward him, let us reward him by our telling him what we really think of him. There can be one opinion on this point. I am on reflection forced to be proud of the gentleman leaving us though I cannot but be sorry that such a man's advantage to us is hopelessly lost.

"There was a regular egress from this school to some other a few years ago. I decline to give my opinion as to how it used to be. It would be raking up an old thing. The refuse only was left here. What is an artist to do if the material he is to work upon were bad or perhaps denied. A teacher is an artist as Mr. Date has just said of the highest and the noblest material viz, the mind. The artist before us namely Mr. Aitken tried to make the most of it with majestic placidity and calmness, contentedness and blissful ignorance as to how he was being dealt with.

"Again, I have asked myself what claim Mr. Aitken has on us for such a reception and honor? He has moulded our thought and character for over 27 years. His students are now respectable public men. The whole public and the more enlightened and respectable part of it has been grounded and seasoned by him This gentleman who is emphatially a man is therefore most emphatically entitled to a fair share of our gratitude He may have done his duty. But duty done cheerfully and well so long as we are not in the Utopain world demands a return of a noble duty. The other duty is gratitude and today we make a demonstration of it."

The spirit and the force of the speech will now [illegible] themselves. The spirit challenges refutation.

After Mr. Desai had done, Mr. Aitken made a speech. The speech would have done credit to any Chancellor of the University of Bombay. He thanked the public, President, ladies, and gentle—men. He referred to his disappoint—ment. But he had strength in his consciousness that he had conscientionely done his work. He was a relic of Dr. Sinclair's time. He advised school—masters to be honest workers inspite of their inevitable misfortunes of neglect and ungenerous and base scrutiny and advised his students to be dignified diligent and reverent. His speech was full of information and instruction. It was very opportune and and we recommend its perusal to our readers. It will never be old and will never fail to attract any one who might take the trouble of reading it. It also will appear *in extenso* in our next issue.

R. D. Hare Esqr. our popular Deputy Commissiener, then unveiled Mr. Aitken's portrait. The public wanted it to be among us after the guest of the evening had gone away from us. Mr. Date had said about this "If the likeness were exact it will speak for the skill of the artist. If it be otherwise it will at least speak for the sincerity of the people in their desire to have it among them inspite of its defect" As no address could be given to Mr. Aitken by the rules of the Government of India, this portrait will be its substitute however inadequate to our desire."

After the distribution of the usual Pansupari, Mr. Aitken went away shaking hands with several gentlemen amid dinning cheers and the flourish of Police Band.

---

It is a matter of pleasure to note that we have got in the Officiating Civil Surgeon of this district an able professional expert. During the short tenure of his office Mr. Apothecary J. Morrison has endeared himself to the public by his noble qualities of heart and head. By way of a gentleman he is accessible to all and ready to hold forth a helping hand. The secret of his popularity and success lies in the cordial relief he administers to his patients and his visits do not hang or prolong for mere lucre of the professional fees. We shall be glad to see him a *pucca* Civil Surgeon at Akola.

---

In 'our next Mutiny' a Civilian observes some causes at work to bring on a mutiny in no distant future. He does the spider's work in giving a connected story which runs as follows:—

"I fear that we have alienated in a great measure the warrior—clans. Our legislation for some twenty years has been in favour of the usurer, the pettifogging lawyer, the fraudulent contractor, and the like, while the gentleman, yeoman, and peasant have been placed under the heel of the money-lending castes. These non-warlike classes, in whose favour we have alienated the affections of the warrior clans, would not raise a hand to help us in the time of trouble—in fact they are not fit to fight. . . . . One result of our legislation for the past twenty years has been to flood the Panjab with lawyers. The feeling of the people is that these lawyers are a set of harpies who bleed them to death. They say that their lands are slipping away from them and being appropriated by the money-lender; that, where their lands have not been taken away by civil court decrees, they bear heavy mortgages carrying ruinous compound interest; or, what is worse, that the mortgaged lands have been taken over by the mortgagee into his own possession."

---

## वऱ्हाड.

हवामान—पाऊस चांगला पडला व मृगशितकाईही येत चालली आहे. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं. यंदाचें साल पिकपाण्याला उत्तम जाईल असें अनुमान आहे.

मे. जी. सी. एटकिन, हेडमास्तर, आकोला हायस्कूल हे गेल्या मंगळवारीं येथून मुंबईस गेले आणि शुक्रवारच्या आगबोटीनें विलायतेस रवाना झाले. त्यांच्या प्रमाण समयीं स्टेशनवर त्यांचे स्नेही व छात्रसमूहयांची बरीच गर्दी झाली होती. साहेब मंडळीनें चा निरोप घेत घेत गाडींत बसले त्या वेळीं लोकांनीं मोठ्या प्रेमानें त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली आणि एटकिन साहेबांचे गुण आठवत आठवत मंडळी घरोघर गेली.

मेहेरबान जी. सी. एटकीन साहेब अकोला हायस्कूलचे हेडमास्तर पेनशन घेऊन वऱ्हाड प्रांत सोडून जातांना गेल्या मंगळवारीं मलकापूर स्टेशनावरून गेले तेव्हां स्टेशनावर लहानसा पण अति प्रेमपूर्वक पानसुपारीचा समारंभ झाला. येथें श्रीमंत रा. रा. दाजी साहेब कोल्हटकर आदिकरून त्यांचे हाताखालीं काम केलेली व शिकलेली बरीच मंडळी आहे. त्यांनीं गांवांतील सर्व प्रमुख मंडळीस ह्या समयीं बोलाविलें होतें. गाडी स्टेशनावर येतांच मंडळीचे विनंतीवरून साहेब बहादुर गाडी खालीं उतरून वेटिंगरूममध्यें आले. तेथें समयास शोभणारी अशी उत्तम प्रकारची शोभा व व्यवस्था केली होती. साहेब बहादुरांनीं दुःख व स्नेहपूर्वक मंडळीचा निरोप घेतल्यावर त्यांस हार, तुरे गजरे अत्तर गुलाब व पानसुपारी देऊन मंडळींनीं त्यांचा मोठा आदर केला व त्यांस त्यांचे डब्यां पावेतों पोहोंचून देऊन गाडी चालू होतांना त्यांजवर प्रेमपुरःसर पुष्पवृष्टि केली. आपल्या घरचा मनुष्य फार दिवसां करितां आपणांस सोडून जाण्याचे वेळीं जसा वियोग वाटतो तशाच प्रकारचा हा वियोग बहुतेकांस वाटला. मि. एटकिन साहेब यांचे अंगीं कांहीं गुण अलौकिक होते ह्या बद्दल ज्यांच्याशीं त्यांचें खरें प्रेम होतें त्यांचीच साक्ष दिली पाहिजे.

वऱ्हाडचे माजी पोस्टल सुपरिंटेंडंट मि. बर्न्स हे विलायतेहून परत येऊन ब्रह्मदेशांतील आपल्या नव्या जागीं रुजू होण्यासाठीं अकोल्याहून मंगळवार रात्रीं रवाना झाले, त्यांच्या चांगलपणामुळें त्यांस पोचविण्याकरितां स्टेशनवर पोस्टल खातेंपैकीं बहुत मंडळी जमली होती.

वाशिमचे हेडमास्तर रा. रा. पुरुषोत्तम गणेश केळकर हे चार महिन्यांच्या रजेवर असल्यामुळें त्या रजेंत तथील फर्स्ट असिस्टंट रा. रा. गंगाधर रावजी सोहनी यांस पन्नासचे साठ रुपये पगार करून अक्टींग हेडमास्तर नेमिलें हें कळविण्यास आनंद वाटतो. आणि फर्स्ट असिस्टंटच्या जागीं रा. रा. पुरुषोत्तमराम जोगदंड ( बऱ्हाणपूरकर ) बी. ए. यांस नव्यानें नेमिलें व थोड्याच मुदतींत हे गृहस्थ कोठें तरी कायम होतील.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर सिव्हील जज्ज, अकोला यांची स्वारी या आठवड्यांत दीड महिन्याच्या रजेवरून परत येऊन आपल्या कामीं दाखल झाली.

आफिशिएटींग सानिटरी कमिशनर डाक्टर रो हे उमरावतीच्या तुरुंगांत तपासणी करितां गेले असतां एका कैद्यानें त्यांस एका दांडूनें बरेंच मारलें. स्वल्प दुखापतीनें साहेब बहादुराच्या जीवावरचें संकट टळलें ही आनंदाची गोष्ट होय. गेल्या दोन वर्षांच्या अलिकडील उदाहरणावरून कैद्याविषयीं विशेष खबरदारी घेणें जेल सुपरिंटेंडंट यांस अवश्य कळलें पाहिजे.

रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी. यांची प्रकृति या आठवड्यांत हवेच्या उपद्रवानें अस्वस्थ झाली होती परंतु ईश्वरकृपेनें त्यांस चांगला आराम पडला हें कळविण्यास संतोष वाटतो.

पिसाळलेलें कोल्हें काल रोजीं फिरत असतांना धांवाधांव करून मारण्यांत आलें ही मोठीच इडापिडा टळली. हल्लीं कुत्रीं फार झालीं असून कांहीं पिसाळण्याच्या स्थितींत आहेत तर त्यांचा समाचार मुनसिपालिटीनें योग्य वेळीं घ्यावा.

---

### नोटीस

नोटीस नेशमी वाळाली चल्हद रायाजी पाटील कोकाटे राहणार खेड कोकाट अंजन गांव पैकीं तालुके दर्यापूर यास खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुजला मी कांहीं तंट्या संबंधीं दावा वगैरे करण्यास ता. ३१।५।९४ रोजीं कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन अनुक्रम नंबर १९ सन १८९४ यास नोंदुनही दिलें परंतु तूं मजशीं इमानें वागत नसून आज पावेतों कांहींच काम केलें नाहीं सबब तुमची मजला जरूर नसल्यामुळें तुह्मास दिलेलें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. तुह्मीं माझे नांवानीं कोणतेंही काम करूं नये कळावें. ता. १४।६।९४

( सही )

निशाणी तानुबाई मर्दे टुनाजी गांवंडे

राहणार इटकी इबा बांगडी.

---

## वर्तमानसार.

नामदार न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे मऱ्हाट्यांचा इतिहास लिहीत आहेत. [illegible] भाग वाचून एका प्रकारचा स्वाभिमान उत्पन्न होतो. असले इतिहास नवीन होत आहेत हा राष्ट्राचा भाग्योदय होय!

कलकत्त्यास एका वृद्धानें एका युवतीला तृतीय भार्या केली आणि त्या विजोडपणाचा परिणाम असा घडला कीं त्या भार्येनें त्या पतीचा खून केला!

हिंदुलोकांत गंगेचें जें अति महात्म आहे तें १८९५ साली नाहींसें होऊन पुढें नर्मदेचें महात्म्य वाढणार अशी त्या लोकांची समजूत आहे. व या संबंधानेंच आंध्याच्या ब्राह्मणांत चितळ लावण्याचा प्रकार चालू आहे.

गंगेच्या महापुरानें हरिद्वार वाहून जाईल व त्या महापुरांत हरिद्वारा पासून काशीपर्यंत ही वाहून जाईल, आणि असें झालें ह्मणजे गंगेचें महात्म नाहींसें होऊन नर्मदेचें सुरू होईल असें गिरिकंदरीं राहणाऱ्या ब्राह्मणांचें ह्मणणें आहे. आणि गंगेच्या उगमा जवळ गोहिना येथें मोठाले डोंगर कोसळून जो एक अति मोठा तलाव झाला आहे तेंच त्याचें कारण आहे असें त्यांचें ह्मणणें आहे.

शेंकडो अफगाण लोक काश्मिरांत आले असून पंजाबांत फळफळावळीची विक्री करण्या करितां जात आहेत.

कोरियाचा बंडावा फार बळावला असून त्यांच्या राजधानीवर हल्ला होण्याची भीति दिसूं लागली आहे व त्याकरतां २,००० चिनीफौज टेंटसिन येथून रवाना झाली आहे.

मांचुरियाच्या हद्दींतील किरिन येथील लोकांनीं फार भयंकर असा बंडावा सुरू केला आहे व त्यानीं सरकारी फौजेचा पराभव करून सरकारचा दारूखानाही आपल्या ताब्यांत घेतला.

अमेरिकनसरकारनें साखरेवर ४० टके जकात बसविण्याचें योजिलें आहे.

इंग्लंडांत बारिस्टर नऊ हजार आहेत.

दगडी कोळशाचा भुका दाबून त्याच्या विटा करून त्यांचा उपयोग जाळण्याच्या कामीं करूं लागले आहेत.

ग्रेटब्रिटन मधल्या ब्यांकांचें एकंदर भांड ९१,००,००,००० आहे. आणि फ्रान्स देशांतल्या ब्यांकांचें एकंदर भांडवल २६,८,००,००० पौंड आहे.

अयोध्याच्या माजी नबाबाचे चिरंजीव ह्यांनीं आपली गरीबी दाखवून, आपणास नादार ठरविण्या विषयीं अलीपूर येथील डिस्ट्रिकट जज्जास अर्ज केला आहे. दैवगति विचित्र आहे!

सेलहा येथें आगगाडीस अपघात होऊन गार्ड व ड्रायव्हर हे दोघे गोरे व फायरमन दोघे काळे असे ठार झाले असें कलकत्याची ता. ८ ची तार सांगते. दोघां गोऱ्यांच्या कुटुंबाच्या समाधानासाठी इंग्रज व इंडियन वगैरे पण नेटिवाबद्दल विचारच नाहीं.

हिंदुस्थानांत सनदी परीक्षा सुरू करावी या संबंधानें हिंदुस्थानसरकारानें विलायतसरकारास जो खलिता पाठविला तो अक्षरशाह लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

लांड रिविनियु कोडांत दुरुस्ती करण्याचा विचार हिंदुस्थानसरकार करीत आहे हे दुरुस्ती कशी काय होणार कोण जाणे.

१८७९ च्या स्टांप अक्टाच्या ८ व्या कलमाप्रमाणें स्टांपाच्या करांत कमी करण्याचा व परत देण्याचा सरकारानें ठराव केला आहे.

कचर प्रांतांत नाटिंग नावाच्या प्रदेशांत महापुरानें शेंकडो माणसें वाहून गेलीं असें सांगतात.

जामरा कालवा तयार करण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. ठा. अ.

हिंदुस्थानांत गव्हांची लागवड वाढत आहे पण हिंदुस्थानांतून बाह्यदेशीं जाणाऱ्या गव्हाचें प्रमाण अजून कमी आहे असें सांगतात.

ब्रह्म देशांत खोटा नाणीं पाडण्याचें काम कोणी करीत असून १८९१ सालचे नाणें पाडलें आहे.

एम० ए० च्या परीक्षेंत तत्वज्ञान व इतिहास या विषयांत जो पहिला येईल त्यांस "काशिनाथ त्रिंबक तेलंग गोल्ड मेडल" नांवाचें पदक स्मारकार्थ देण्यांत येणार.

काबूलचे अमीर साहेब इंग्लंडांत जाऊन महाराणी साहेबांची भेट घेऊन सर्वांचा जीव रशियाच्या बाबतींत थंडगार करणार. म० मि०

आग्रा येथील तुरुंगांत कांहीं कारागीर आहेत. त्यांजगडून ७७ फूट लांब व ४० फूट रुंद असा एक गालिचा महाराणी साहेबांस नजर करण्या करितां तयार करविला आहे.

हिंदुस्थानांतील आगगाड्यांवर सर्व जातीचे मिळून एकंदर १७८३६२ नोकर आहेत असें रेलवेच्या पत्रकावरून समजतें.

युरोपच्या लढाईची फुणगी— बल्गेरियाचें राजधानी शहर जें सोफिया तेथें भररस्त्यांत लश्करी लोक व प्रजाजन यांच्या मारामाऱ्या चालू आहेत. कित्येक पोलिस व लष्करी लोक माजी मुख्य प्रधान एम स्टांबोलफ यांच्या पक्षाचे झाले आहेत असें तिकडून आलेल्या तारेवरून समजतें. बल्गेरियाचे राजे फर्डिनांड यांचें व त्यांचे मुख्य प्रधान स्टांबोलफ यांचें जमेना ह्मणून त्यांनीं मुख्य प्रधानगिरीचा राजीनामा दिला. हे मुत्सद्दी रशियाचे पूर्ण विश्वासुक आहे व ते कामावरून निघाल्या मुळें लोक चवताळले आहेत. हें प्रकर्ण कितपत चिडोस जातें हें पहावें युरोपच्या पायवीस हें बल्गेरियन प्रकर्ण केव्हांना केव्हां तरी कारण होईल असें होईल असें बहुतेक मुत्सद्यांचें मत आहे, ह्मणून ह्या प्रकर्णानें युरोपांत काळजी उत्पन्न झाली आहे.

अफगाणिस्थानांत खटपट —मेमना ( अफगाणिस्थान ) येथल्या वजनदार पुढाऱ्यांनीं पेंजडे येथील रशियन गव्हरनरास असा अर्ज केला कीं, अफगाणी अमीर आह्मास त्रास देतो व गांजितो याबद्दल मेमना शहर घेण्याची तुमची इच्छा असल्यास आह्मी तुह्मास मदत करूं. ही गोष्ट अमिराच्या कानावर गेल्यामुळें अमिरानें फौजा पाठवून त्या अर्ज करणाऱ्या ९२ पुढाऱ्यांस पकडुन काबुलास नेले आहे. व तेथें त्यांची चौकशी व्हावयाची आहे असें अलहाबाद येथून आलेल्या तारीख २१ मेच्या तारवरून समजतें.

पोंडेचरी येथें भुईमुगाच्या शेंगास तेजी येत आहे हल्लीं एक फ्रेंच खंडीस २३ रुपये असा शेंगाचा भाव आहे.

नुकत्याच सांपडलेल्या येशूख्रिस्ताच्या चरित्रावरून असें समजतें कीं येशू ख्रिस्त हा काशींत वेद वाचावयास शिकत होता; असें एका वर्तमानपत्रांत लिहिलें आहे.

लाहोर जवळ गुजरणवाला नांवाच्या गांवीं हल्लीं प्रो० छत्रे ह्यांची घोड्यांची सर्कस आहे. तेथील लोकांना ह्या सर्कसीचें इतकें वेड लागलें आहे कीं, जवळ असेल नसेल तें गहाण ठेवून गरीब लोकही सर्कस पहावयास जातात, असें ट्रिब्यून पत्रावरून समजतें.

वसीत कोणी एक कुशल शिल्पकार असून, तो विलायती जिनसांप्रमाणें, मुरेल जिनसा तयार करतो. असें ह्मणतात कीं त्यानें एक कृतीचे गुलाबाचें फुल तयार केलें असून तें अगदीं हुबहुब फुलाप्रमाणें दिसतें. इतकेंच नव्हे, तर त्या फुलांत सुरेख सुवास उत्पन्न करणारीं द्रव्यें घातलीं असून तो वास दोन तीन वर्षंपर्यंत राहूं शकतो. न्या० सु०

कोरियांत बंडावा सुरू झाल्या कारणानें चिनी सरकारनें २००० लष्करी लोक तिकडे रवाना केले आहेत. येंद्राच्या सालीं जिकडे तिकडे धामधूम दिसते.

अमेरिकन सरकारानें साखरेवर ४० टके जकात बसविली यांचें नांव व्यापारास मदत!

अमिरांनीं गैमेना येथें कांहीं स्वार पाठविले आहेत.

हिंदुस्थान सरकार कलकत्यास आल्यावर नव्या करावद्दल विचार करतील.

पंजाबांत अफगाण लोक फार अल्पाकारणानें त्यांना हांकून लावण्यांत आलें.

उत्तमसिंह नांवाच्या दरोडखोरास हैदराबादेस फांशीची शिक्षा देण्यांत आली.

सिंधैहैद्राबादच्या आसपासच्या जिल्ह्यांत फार दरोडे पडतात असा तिकडे बोभाटा झाला आहे.

आफगाणिस्थानचे अमीर आपली फौज वाढवीत आहेत. हाच का इंग्लिश दोस्तीचा उपयोग.

खैबर अरमार सरहद्दीबद्दल अमीर व हिंदुस्थान सरकार यांच्यांत पत्रव्यवहार चालला आहे.

बुडी मारणारीण— मिस आकरमन या नांवाची एक मडम आहे ती साठफुटी खोल पाण्यांत बुडी मारू शकतें. सु० प०

## नोटीस

रा. रा. नारायण चाळक राहाणार पेठ खामगांव यास नोटिस देणार लक्ष्मी मर्दे नारायण राहाणार खामगांव इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे बरोबर माझे लग्न होऊन आज सुमारें नऊ वर्षें जाहालीं ह्या नऊ वर्षांत सुमारे पांच वर्षें तुमचे पाशी राहिली व संसार केला. परंतु अलीकडे सुमारें तीन वर्षें जाहालीं मी तुमचे पासून निरउपाय होऊन आपले बापा जवळ येऊन राहिली. तुह्मांस अलीकडे पांच वर्षांत माहारोगाचा आजार इतका जाहाला आहे कीं तुह्मी मजूरी वगैरे करण्यास लायक नाहीं. इतकेंच नाहीं तर लोक ही तुह्मास मजूरीसाठीं माहारोगाच्या अतिशय जाहलेले व्याधीमुळें मजुरीस बोलावीत नाहींत व तुमचे हातून मजूरी ही बिलकूल होत नाहीं. मजला पोटापाण्यास घालणेचा तुमचे पाशीं कांहीं एक दम बिलकूल माहारोगाच्या आजारामुळें राहिला नाहीं. व मी उपाशी मरू लागली. व माझे जन्माचें मातेरें होऊं लागलें वगैरे कारणामुळें मी आज तीन वर्षें तुमचे नांवावर कर्ज काढून कसा तरी निरवाह केला तुमचे जवळ राहून बायकोस नवऱ्या पासून ह्या दुनीयेंत जें सुख असतें तें तर तुह्मापासून मिळण्याचें कांहीं साधन माहा रोगाच्या व्याधीमुळें राहिलें नाहीं. शिवाय मजला तुह्मी पाटाप ण्यासही देत नाहीं व देणेस तुह्मांजवळ कांही सुद्धां नाहीं. याजकरितां तुह्मास कळवितें कीं, तुह्मी माझे तीन वर्षांच्या खावटीचे रुपये १५० दिडशे आणून द्यावेत व मजला पोटापाण्यास जें लागतें त्याची तजवीज करून माझी व्यवस्था लावावा. नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सदरील तजवीज करून चार जात भाई [illegible] खात्री करून द्यावी. ह्मणजे मी तुमचे नांवावर राहण्यास तयार आहे. असे जाहालें नाहीं तर हीच मची फारकती समजून निरउपाय होऊन दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा कोणचे ही प्रकारचा हक्क मजवर नाहीं. व खावटीचे रुपये १५० दिडशे बद्दल कामें चालऊन ह्या नोटीसीचे खर्चा सुद्धां सर्व भरून घेईन ह्मणून दिली नोटीस सही तारीख ११ माहे जुलई सन १८९४ इसवी.

(सही) चा निशाणी बांगडी लक्ष्मी मर्दे नारायण राहणार खामगाव इच्या हातची असे.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोलें म्युनसिपल कमेटीचे हद्दींतील बारा फत्तराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९४।९५ इसवी साला बद्दल ता. ९ माहे जुलै सन १८९४ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांचो घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहु वेळीं टाऊनहालांत हजर व्हावें कळावें तारीख ८।६।९४

Md. Husain
Secretary
A. M. C.

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालभरीचें ११ ७ ,, १८
किरकोळ अंकास .....................८२

नोटिसीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly............3 8 as.
Single copy.................................. 1as

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

VOL XXVIII AKOLA 25 MONDAY 1894 JUNE NO 25

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २५ माहे जून सन १८९४ इ० अंक २५


## ह्या राजश्रीने केव्हां तरी पळ काढला असावा

एका गृहस्थास त्याच्या धर्मवेडामुळें एका जुलमी सरकारानें कारागृहांत ठेविलें. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत व गडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें काळ काढीत रहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या वृक्षाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या बाहेरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची जागाही जाळी नव्हती. त्याच्या मनांत योजूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उंची जमीनीवर मारली आणि त्या प्रदेशास रोंखटचा राप राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ह्या झालेल्या विचारास एकीकडे ठेवून पिचारापी दोरी जर सैल सोडली असती तर या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक. त्याला ह्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र ह्यावानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खाली लोकांस व साच्या पाहुण्यांस सांगतों. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, चित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेलें आहे. नेहमी थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेलें ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसें, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घढ बेढका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाइकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरप ( माता शिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्या मुळें मी तें औषध घेण्यास सुरू केलें. मी थोडे थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें. आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथराव एक वर्ष सतत बेबन्दादर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची घुमट होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखा च झाला. मला पक्कें माहीत आहे कीं, ह्या प्रदेशांतल्या दग्याच मंडळींनें दुसरे नांना उपाय करून थकले व जेव्हां ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे माता सिजेलच्या पाकाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें माहीत असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसील ) एम वार्ड
१९७ हकसटन रोड
शफर्ड बोटिंगहाम

ता. १ ली माहे एप्रिल सन १८९९

मीसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगापासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या कुटुंबांत सोळा वर्षांचा वाटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच दुराव समजावयाचें. कुठेशी सोबती दोणें फारच थोड्याच्या हकीकती लिहिलेले असतें. परंतु सुदैवता ही सूर्य प्रकाशासारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरते तशीच ही पसरली पाहिजे. ही कथा रात्रीची हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व ती दूर टाळण्यास आपल्या स्वाधीनें करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच चोकणारा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरीरातील सर्व अंग त्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणा मुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरीरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठमोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची युक्ति माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सर्वोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखावरून समजेल. H. D.

---

नादारी मोकदमा नंबर २९ सन १८९०.
नमुना नंबर ( जी )
विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज
जि० अकोलें.

सर्व लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, सेख इस्माइल वल्लद सेख हुसेन रा० बाळापूर हा नादार आहे असा आज तारीख १६ माहे जुन सन १८९४ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २१ माहे जुलई सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचे असाईनी नेमून देण्या करितां व नादारांनीं आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करीता नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीसींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याज बद्दल ज्या साक्षीस समजलें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं ही नोटीस नमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करिता नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावें नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरा पुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील आज तारीख १८।६।९४

B. B. Sula.
नादारी कोर्टाचे जज्ज जि० आकोला.

---


किंमत १० आणें
## गुरुचरित्र
पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास
दर प्रतीस
आठ आणे
हा ग्रंथ आज पर्यंत ०।१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.
आर्य भूषण छापखाना, पुणें.


---

## "खरा सुखी कोण .

( २१ वे अंकावरून पुढें चालूं )

तपश्चर्या करून ज्यांचीं शरीरें क्षीण झालेलीं आहेत व जे ईश्वरसेवा व मोक्षसाधन या मध्यें पूर्ण मग्न झालेले त्या महाप्रतापी मुनिवर्यांना जो सुखाचा निधि हातीं लागला त्याचें मोल कोणी करें! आणि विक्रमा सारख्या अतुलपराक्रमी सार्वभौमांना जे सुखतरंग-कण लाभले त्याची किंमत कोणी करें? रामदासा सारख्या महा साधुसंतांना नुसती छाटी नेसून जें सुख वाटलें असेल त्याची व एखाद्या बादशहाला मौल्यवान रत्नहारानें शरीर शृंगारून जें सुख वाटलें असेल त्याची बरोबरी होईल काय? रात्रीं ज्या वेळेस गगन रत्नतुल्य नक्षत्रतारादिकांच्या संघानें शोभिवंत होतें त्यावेळेस आपली आवडती व जीव कीं प्राण दुर्बीण व दुसरीं कांचयंत्रें घेऊन त्यांच्या साह्यानें आकाशांतील असंख्य तेजःपुंज मणिसमुदायांचा वेध घेण्यामध्यें एखाद्या ग्यालेलियोला होणारा आनंद आणि निशासमयीं नक्तंचराप्रमाणें नगरामध्यें संचार करून वारयोषितारूपी एखादी रत्नकणिका गवसली ह्मणजे तल्लीन होणारा व तिलाच "मम जिवाची प्रियकरणी" मानणारा रंगेल व गुलहौशी यास होणारा आनंद हे दोन जर पारड्यांत घातले आणि तुलना केली तर एक पारडें कोठल्या कोठें जाईल त्याचा थांग सुद्धां लागणार नाहीं. परोपकारासाठीं दानावसिकानें ज्याचे हस्त नेहमीं आर्द्र झालेले असतात व आपलें तनमनधन अर्पण करण्यामध्यें जे मागेंपुढें पाहत नाहींत त्या महात्म्यानां घडणारें सुख व चौपैकापैपट्टु व परपीडादक्ष असे जे दुरात्मे त्यांना वाटणारें सुख या दोहोमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे हें कोणीही सांगू शकेल. सारांश एवढाच कीं आह्माला सुखदुःख हें लागलेंच आहे; पण जो कांहीं सुखभाग आह्माला मिळावयाचा त्यामध्यें कांहीं अंश असार व भ्रांतिमूलक असा आहे. व बाकीचा निर्दोष व खरा आहे. आतां बावनकशी सोनें व हिणकस सोनें यांतून बावनकशी सोनें पारखण्याला कांहीं तरी ज्ञान लागतें. त्या वांचून उत्तम सोन्याचा लाभ व्हावयाचा नाहीं! आळवाच्या पानावर जलबिंदूनें उत्पन्न होणारें कृत्रिम मौक्तिक व जलनिधीच्या गंभीरोदरांमध्यें स्वातीजलबिंदुनें शुक्तिपुटामध्यें क्रमानें केलेलें मौक्तिक या दोहोंची खरी परीक्षा होण्याला ज्ञानच पाहिजे! त्या शिवाय खऱ्या मौक्तिकाची प्राप्ति घडणार नाहीं, त्याच प्रमाणें खरें सुख प्राप्त करून घेण्याला ज्ञानाची प्राप्ति करून घेतली पाहिजे. आणि ज्ञान सुद्धां अस्सल व उंची पाहिजे. नाहीं तर

उथळ पाण्याला खळाळी फार या ह्मणी प्रमाणें स्थिती व्हावयाची. कारण आह्मी पुष्कळ पढलों, हजारों ग्रंथ उलथेचपा पालथे केले विश्वविद्यालयांतून पदवीगुच्छ घेऊन बाहेर पडलों, पण मनावर विनयाचा, सहिष्णुतेचा, परोपकार बुद्धीचा, समाधानाचा विशद व अकलुष असा संस्कार जर झाला नाहीं तर मग काय उपयोग! वाचक हो, खऱ्या नाण्याचीच खरी किंमत व खरी चहा. आतां हें खरें ज्ञान कोणतें हें थोडक्यांत सांगितलें ह्मणजे झालें. सृष्टीचें ज्ञान झाल्यावर, "मी" कोण याचें तात्विक ज्ञान होणें व त्या पासून जगन्नियंत्याचें ज्ञान प्राप्त करून घेणें ह्मणजेच खरें ज्ञान. ज्यानें प्राप्त करून घेतलें, त्यालाच खऱ्या सुखाचा अमोघ लाभ घडला यांत तिळमात्र संशय नाहीं! कोणी असा प्रश्न करतील कीं " मांजराचें गळ्यात घंटा बांधावी ह्मणजे झालें" हें तर एखाद्या वयोवृद्धां प्रमाणें आह्माला सांगता पण ती घांट बांधावयाची कशी ? खरें ज्ञान प्राप्त करून घ्या, खरें ज्ञान प्राप्त करून घ्या ह्मणजे आह्माला खऱ्या सौख्याचा लाभ घडेल ह्मणून आह्माला उपदेश करिता पण तें खरें ज्ञान प्राप्त करून घ्यावें कसें? बरें तसल्या ज्ञानाची प्राप्ति झाली ह्मणजे मग सर्वांनां वनवासी बैरागी बनलें पाहिजे! मग संसारयात्रा ही नामशेष करणार कीं काय! याला उत्तर दिलें पाहिजे! " प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलही गळे " ही कवीची उक्ति नीट ध्यानांत धरून जर प्रत्येक मनुष्यानें आपला वर्तन क्रम ठेविला तर मग काय साध्य होणार नाहीं. सारांश खऱ्या ज्ञानाची प्राप्ति होईपर्यंत त्याचा पिच्छा सोडावयाचा नाहीं असा निश्चय केला म्हणजे खरें ज्ञान पळून जाणार नाहीं, कांहीं नाहीं. खरें ज्ञान हें निश्चयाचें फळ आहे. खऱ्या ज्ञानाच्या प्राप्ती करितां अंगाला राख लावून अवधूत बनण्याची व संसार हा असार आहे समजून त्याचा परित्याग करावयाची वेळ येईल अशी भिती कित्येकांना वाटत असेल तर ती केवळ भ्रांतिमूलक आहे. हल्लीं संसार विकार, व दुर्गुण यांनीं परिप्लुत आहे तोच सुगुणांनीं अलंकृत करण्याची प्रत्येकानें खटपट केली पाहिजे. संसाराच्या हल्लींच्या मायावी स्वरूपाला भुलून पुष्कळ लोक जातात. आणि त्या मुळें हा सर्व घोटाळा झालेला आहे. व संसार हा सुधारण्या विषयीं जर आम्ही कांहींच काळजी केली नाहीं तर आहे हीच स्थिति राहील! निवडुंगांचा गुलजार, व गोंडस अशीं तांबडीं फळें पाहून जर एखाद्याचें मन रममाण होत असेल तर त्याला दुसऱ्यानीं काय करावें ? तसेंच इक्षुदंडाचा रसास्वाद घेतल्या वाचून तो कृष्णवर्ण आहे, व वक्राकृति दिसतो एवढ्याच वरपंगी दोषांवरून त्याला नालायक म्हणण्याचें जर एखाद्यानें धार्ष्ट्य केलें तर त्याला आवरणारा काय करणार! डौलदार, गोल असें मोत्यांचे दाणे एखाद्याच्या पुढें मांडावे व त्याला शिंपाच आवडल्या तर त्याला आपला काय इलाज! इतकेंच सांगून हा लहानसा लेख पुरा करतों.

---

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ७ शके १८१६

# ऋणविमोचन.

## आकोला मुनसिपालिटीची कृतकार्यता.

कोणत्याही मनुष्याला त्याच्या त्याच्या समाजरचने प्रमाणें कांहीं हक्क व अधिकार प्राप्त होतात, त्याच्या गांवाच्या स्थिती प्रमाणें त्याला कांहीं सुखदुःखाच्या गोष्टी आपोआप मिळतात आणि त्याच्या गृहस्थितीच्या मानानें त्याला संपत्ति, घरदार, व अनुवंशिक संस्कारयुक्त मनोभू हीं स्वकृती विना मिळत असतात. या अयाचित लाभाचे आपण धनी होतो म्हणून त्याचा मोबदला देण्याची आपल्यावर एका प्रकारची जबाबदारी असते. तात्पर्य एवढेंच कीं मागील पिढ्यांनीं आपणावर न कळत अनेक उपकार केले आहेत, किंबहुना त्यांच्या उत्तम कृतीचे आपण उपभोक्त बनलो आहों तेव्हां ती उपकारश्रेणी आपण पुढें अव्याहत चालवावी हें आपलें कर्तव्य आहे. आपण कर्तव्य बजाविलें ह्मणजे आपल्या पुढील पिढ्या आपल्या ऋणी होतील आणि ते उपकार फेडण्यासाठीं त्या भावी पिढ्या त्यांच्या भविष्यकालीन वंशजावर आपल्या सत्कृतींचें निराळें ऋण लादतील. सत्कृतीचा फायदा दोन प्रकारचा होतो. कार्यकर्ता व कार्योपभोक्ता याना आनंद होऊन कार्यप्रेक्षकांच्या मनांत अनुकरणबुद्धि जागृत होते. प्रत्येकानें आपल्या कुळाची, ग्रामाची, आणि समाजाची या प्रकारें अभिवृद्धि होत जाईल असें वर्तन ठेविलें ह्मणजे त्यानें आपल्या जन्माचें सार्थक्य केलें असें होईल.

आकोला मुनसिपालिटीनें वरील प्रकारच्या ऋणविमोचनार्थ यथायोग्य उत्तम कृती करून ठेविली आहे ह्मणून आह्मांस विशेष आनंद वाटतो. मुनसिपालिटीची संस्था ही एका दृष्टीनें अजरामर आहे पण तिच्या या पिढीच्या चालकांनीं तिला जें स्थैर्य दिलें आहे तें वर्णनीय असून त्याची फलप्राप्ती आह्मांस व आमच्या भावी आकोलेकर प्रजेस अव्याहत होत जाईल ह्मणून आम्ही त्या कृतीचें विशेष अभिनंदन करितों. ही कृती ह्मणजे आकोल्यास नळाच्या पाण्याची नवी योजना होय. या गांवीं मागें पाण्याची फार हाकाटी असे. पुढें नदींत विहिरी खणून कांहीं वर्षे पाण्याचा तजवीज केली. नंतर वरच्या भागास अनिकट बांधल्यानें ग्रामस्थांस पाण्याचें सुख विशेष झालें. पुढें कर्नल फिटझरल्ड साहेबांनीं खालील धरण, व वालुकामय हौद मुनसिपालिटी कडून बांधविले; नदीची उपयुक्तता वाढली आणि लोक अधीक आनंद पावले. आणि आतां तर स्वच्छ, गोड, पाचक व शक्तिवर्धक नळाचें पाणी सांप्रतच्या मुनसिपल अधिकाऱ्यांनीं गांवकऱ्यांस आणून दिलें आहे. ही सुखाची उत्तरोत्तर वृद्धि पाहून लोकवृंद आनंद पाऊन मुनसिपालिटीच्या चालकांचे खरोखर आभार मानतील.

वस्तु वाटे नवी जों । आवड बहु तिची लोकरीति अशी हे । या ह्मणी प्रमाणें हल्लीं आमच्या गांवांत आबालवृद्ध नळाच्या पाण्या संबंधानें गप्पा गोष्टी बोलत असतात. आमचे बंधू वैदर्भ कर्ते व शुद्ध वऱ्हाडी हे तर आपल्या आगाऊ लेखांनीं, व आठ दिवसांत पाणी येणार, पंधरा दिवसांत पाणी येणार इत्यादि ऐकिव गोष्टींनीं लोकांच्या आवडत्या मनःकल्पित गोष्टीकथनास प्रोत्साहन देत आहेत. आम्हास मोठा आनंद वाटतो कीं बहुत दिवसा पासून इच्छिलेल्या मनोरथाची सिद्धी थोडी बहुत अनुभवास आली. उदाहरणार्थ, हल्लीं नळांचें पाणी पेठील धर्मशाळेंतील नळावर पाहिजे त्यास यथेष्ट पिण्यास मिळेल. कांहीं दिवसांच्या अवकाशांत सर्व गांवभर नळाच्या पाण्याचा विपूल पुरवठा होईल तेव्हां मुनसिपालिटीची सुकृती उत्तम प्रकारें सफल झाली असें आम्ही अत्यंत उल्हासानें आमच्या लोकनियुक्त सार्वजनिक मुनसिपल सभेस कळवूं.

---

महाबळेश्वरच्या श्रीकृष्णेच्या देवालयांत मुंबई सरकारचे ओरिआंटल ट्रान्सलेटर मि. मिरझा अली बेग हे शिरले आणि त्या मुळें ते पवित्र स्थान भ्रष्ट झालें म्हणुन महाबळेश्वर कडील हिंदू लोकांनीं सरकारपाशीं दाद मागितली होती. त्या बाबदींत मुंबई सरकारनें खेद प्रदर्शित करून आपल्या ठरावांत देवळादिकांची पवित्रता राखण्या विषयीं विधर्मी लोकांनीं काळजी घ्यावी असें निक्षून सांगितलें आहे. बिन दाढीवाला मुसलमान कसा असेल अशा बहाणीनें मि. बेग यांनीं बुद्धिपुरस्सर पवित्र हिंदुदेवालयांत प्रवेश केला आणि स्वकृतीच्या पश्चात्तापानें त्यांनीं पन्नास रुपये देवालयाच्या पवित्रीकरणाकडे अर्पण केले असें सांप्रतच्या प्रसिद्ध झालेल्या पत्र व्यवहारावरून स्पष्ट दिसतें ! असले प्रकार पुनः पुनः न घडतील तर बरें!

---

पुण्याची रेशमी व सुताची गिरणी अखेर बंद करण्यांत आली आणि तिची इस्टेट कर्ज फेडीकडे लावण्यांत आली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. डायरेक्टर व भागिदार यांचा विचार तीन महिन्यांचे मुदतींत सावकाराचें कर्ज फेडून गिरणी पूर्वीप्रमाणें सुयंत्र चालू करण्याचा होता परंतु पुण्याच्या जिल्हा कोर्टाचे न्यायाधीश क्रो साहेब यांस तीन महिन्यांची सवलत कायद्यानें देतां येईना. न्यायाधीशांनीं आपला खेद प्रदर्शित केला कीं औद्योगिक संस्था पैकीं ही बालसंस्था अशा अल्प काळांत चिरडून टाकण्याचें संकटमय काम करण्यास मन घेत नाहीं. परंतु कायद्यानें तसा हुकूम फर्मावणें भाग झालें आहे. या कंपनीचे दोन एजंट शेट शिवलाल व बालमुकुंद अशा दोन पेढ्या आहेत. आपसात परस्परांचें पटेना, एकी लयास गेली, आणि फाटाफूट होऊन अखेर गिरणी लयास गेली. दुःखात सुख एवढेंच कीं कंपनीची इस्टेट सरासरी दहा लक्ष रुपयाच्या किंमतीची आहे आणि कर्ज फक्त ९ लक्ष ८० हजार रुपये आहे. कर्ज फेडण्या इतकी आज मितीला रक्कम गोळा झाली नाहीं ह्मणून गिरणी मोडण्याचा सरकारी हुकूम झाला तथापि सांपतस्थिती वरून अशातंतु अद्याप थोडा ठरला आहे. कोणी धन ढ्य व धार्स्थवाईक मंडळींनीं ही गिरणी विकत घेऊन कर्जाची निरवानिरव केली तर ही गिरणी चांगली चालण्या सारखी आहे. महाराष्ट्रांत हा पहिलाच प्रयत्न रेशमी गिरणीचा आहे तर तो यथावस्तु कायम ठेविला तर औद्योगिक चळवळी पासून लोकांची मनें परावृत्त होणार नाहींत. ईश्वर करो आणि ही गिरणी चिरायुपणें पुन्हा भागीदार नव्यानें सुरू करोत.

---

बकरी ईदीचा मुसलमानी सण निर्विघ्नपणें पार पडला खरा परंतु त्या सणाच्या दिवशीं सरकारच्या दारूगोळ्याच्या व पलटणीच्या कडेकोट तयारीनें विघ्न प्रतिबंधक पूर्वीच दृढ शत घालून ठेविली होती. तलवारीच्या बळा वरील हा अंमल किती काळ टिकणार आहे हिंदुचें गोरक्षण व मुसलमानाचा गोवध हीं इंग्रजी राज्याच्या बळकटीचीं मूळतत्वें आहेत कीं काय ? निष्पक्षपातबुद्धीनें, प्रांजलपणानें व सख्यत्वानें उभय लोकांस आपलेसे करावें हाच राजमार्ग आहे. तिऱ्हाईता प्रमाणें मध्यस्ती करून दोंही लोकामधील लढाई मिटविली पाहिजे. परंतु हल्लींच्या बंदोबस्ताच्या व्यवस्था किती नामी आहेत बरें!

---

वायव्य प्रांतांतील बरेलीच्या हिंदु लोकांनीं गोवधा संबंधानें सरकारास अर्ज केला होता परंतु तो अर्जच मंजूर होण्यास शतावधि विघ्नें आलीं! बरेली गांवीं मूळ वस्ती हिंदु लोकांची असून मुसलमान लोकांची थोडी आहे. तेव्हां गोवध गांवाच्या आत होऊं नये ह्मणून हुकूम फिरला होता. परंतु तें पारडें अखेर भलतीकडे वळलें आणि त्या गांवांत एक दोन नाहीं तर एकोणतीस गोवधशाळा मुसलमान लोकांच्या घरांत चालू करण्यास परवाना दिला. फक्त अट इतकीच ठेविली कीं गोवध लोकदृष्टी आड करण्यांत यावा. हिंदु लोकांनीं या गोवधशाला विरुद्ध अर्ज केला आणि तो अर्ज अखेर भवति न भवति होऊन व व बराच पत्रव्यवहार चालून स्वीकारण्यांत आला आहे. बरेलीच्या मुख्य माजिस्ट्रेटाकडे त्या अर्जावर सही करणाऱ्यांची योग्य शहानिशा करण्या साठीं हुकूम दिला आहे. चौकशींत नवल हें दिसलें कीं अर्जदारांनीं सह्या आपखुषीनें केल्या नाहींत असें त्यांच्या तोंडून काढण्या साठीं पोलीसमार्फत हरप्रयत्न झाले. तिवे अर्जदार प्राण जावो अथवा राहो अशा निर्धारानें व सत्य प्रतिज्ञेनें सरकारापुढें आले असल्या मुळें सर्व प्रयत्न हरले ! परंतु कांहीं भेकड, विश्वासघातकी, व नरो वा कुंजरो वा ह्मणणारे भ्रष्टवचनी लोक चौकशीच्या वेळीं कानावर हात ठेवूं लागले. बरेलीच्या लोकांस काय ह्मणून हंसावें ? आमच्या प्रांतांत अशा कोटींतले तोंडपुजे, अजगलस्तनवत वागणारे लोक देखील शेंकडो मिळतील. परंतु इतर बरेलीच्या हजारों गांवकऱ्यांनीं त्या अर्जाच्या खरेपणा बद्दल, आपल्या त्या वरील अनुकूलते बद्दल आणि अर्जदारांच्या प्रतिनिधीपणा बद्दल माजिस्ट्रेटाची पक्की खात्री करून दिली.

---

The Berar Samachar

MONDAY JUNE,

25 1894

As announced in our last issue we give the speech of Mr. G. C. Aitken delivered by him at the Town Hall this day fortnight. The speech is as far as possible word for word. For want of space we are forced to dispense with Mr. Date's speech.

Mr. Aitken's Reply.

"Gentlemen of Akola, I thank you, from my heart, for the honour which you have done me by inviting me here this evening to meet you all to exchange a few words of fare-well, and for the kindly feeling you have shown in asking my personal friends to be present, and I thank you, Mr. Chairman, and you ladies and gentlemen around me, for the honor you have done me by coming. I trust I prize, more than words can express, the friendly feeling and the kind appreciation which have moved you to give me this public reception, and to desire to have me with you in my portrait after I myself have gone, and the honour which you have done me in making this meeting the occasion of a graceful ceremony, the unveiling of my portrait by Mr. Hare.

In the speeches which have been made, the handsome terms in which my life and service in this Province, were referred to, were, as I could not but feel, far in excess of what I have deserved, and I can only wish that I could honestly feel that I have more fully merited the language of praise, and appreciation in which the speakers so kindly dwelt on myself, and my work in Berar.

All the same I have been deeply touched and gratified by the kind sentiments expressed in the two speeches, and by the friendly manner in which they have been received by the meeting.

The Educational Department in Berar was started in April 1866 when Dr. Sinclair was appointed the first Director of Public Instruction, and I arrived the following November and opened the Amraoti High School.

If I am the only survivor of the men who joined the Department in 1866, there are, I suppose, two or three only left. Death has been busy with many, and some are living in the enjoyment of their well earned rest, till they too shall pass away. In September 1872 I was transferred to Akola, and since then, for over twenty one and a half years, I have been here a prominent figure before you, engaged in duties bringing me into closer relations with you, and subjecting my character and doings to keener scrutiny and more general criticism, than any other kind of service would have done.

If I have committed faults I have not escaped being told of them, and sometimes very plainly, but I have to thank kind friends, whoever they may have been who, from early years, have from time to time, taken on themselves the friendly task of making known the good points they believed they had found in me.

Gentlemen, I have now finished my course in Berar, and am about to leave India, and I cannot conceive it possible for any earnest man to leave a place where he has lived, and laboured, and struggled, for as many years as I have done in this Province, without earnest thoughts and deep feelings while there is a happy sense of relief in being at last free from official bondage especially when, as in my case, it has been one life struggle with little reward except that which comes from a conscience which can tell of duty patiently unflinchingly, and successfully done, still there must always be some pleasant memories which attach one to the scene of one's life's labours however crushing these may have been and in my case there are many pleasant memories, memories of friendships, of social kindnesses, and of pleasant gatherings in camp and station.

Gentlemen, the success of a life is not necessarily the attaining to a high position and a large salary. It would be a sad matter for many if it were. But it is not. High place with the money it brings, is, just as often as not, as you must know, the reward, not of merit, but of accident the accident of having, at the right moment, the needful friend at court, and then merit goes unrecognized.

But "Fame is the spur the clear spirit doth raise, To scorn delights, and live laborious days," and ambition accompanied by a proper consideration for others, is the real incentive to every manly virtue, and the man who puts before him a worthy ambition, the ambition to excel, to rise to a high position of power and influence to be used when attained for the good of his fellowmen, and works steadily and honestly towards it, setting an example to all associated with him, of courage, integrity, and justice, and by his life, influencing others for good, that man, if he fails to attain his ambition, through circumstances over which he has had no control, has no cause to consider his life a failure. If may, on the contrary, have been a great success

And, gentlemen, I would fain believe that my life in Berar, has not been a failure. I have failed to obtain the object of my ambition, but I have striven hard to reach it, and, if in doing so, my life has been an example to you of manly rectitude and strict justice as I have wished and tried to make it; if it has been an example of manly enduring and endeavouring—the highest example a man can set, and if any for whom and among whom I have worked, have been made happier and better through my having lived, so that, after I have passed away, myself and my teachings will live in the memories of some, influencing them in their daily lives to despise what is mean and insincere, and to follow that which is right and honourable, then I shall have no reason to regret my life in Berar. It will have been a success and not a failure.

Remember that, those of you who are inclined to despond because the objects of your ambition seem still far from you, need not despair.

Some of you before me are masters, and to you I would say, I know well the inevitable discouragements of your lot, as I have myself had ample experience of them, the weary repetitions, the dulness of some, the idleness of others, the low aims of many parents, the exactions of superiors, and, worst of all, the ungenerous criticisms and also the false standards of estimation which may be applied to your work.

How are you to contend against those disadvantages?

In one way only. By honest work directed towards high aims, by sincerity, and by a determination to act justly which no influences on one side or the other, will be able to shake.

I see a number of students and pupils, and to them I would address a few words of warning and advice. Be diligent. Diligence implies many virtues, it implies resolution, perseverance, self-reliance, and working honestly. Give always diligent, humble, and reverent, attention to your teachers, remembering that, as a rule, they are interested in your advancement, and do their best for you according to their abilities.

Cultivate truth. Truth means much. It not only means always saying the thing that is, and refusing to say the thing that is not; it also means never to make a promise unless you really intend to fulfil it; it means sincere thinking, sincere feeling, and sincere acting, and it means a whole sole abhorrence of that most despicable of despicable manifestations of human character, the trying, under false cloak of friendship, to make a man believe you to be his friend when you are not.

( to be continued )

---

## वऱ्हाड.

हवामान — या आठवड्यांत पावसानें बहार करून दिली. पेरे झपाट्यानें चालले आहेत. रोगराई विशेष नाहीं.

लेफ्टेनंट राबर्ट प्याट्रीक हार्सब्रव असि. कमिशनर खामगांव यांस लेफ्टेनंटच्या हुद्याच्या ऐवजीं क्याप्टन हा बहुमान सूचक लष्करी हुद्दा मिळाला. आणि यांस खामगांव व जळगांव या दोन तालुक्या साठीं सब डिव्हिजनल माजिस्ट्रेटीचा नवीन अधिकारही देण्यांत आला.

रा. रा. विठूजी नारायण तहशीलदार, केळापूर यांस गेल्या १९ वे तारखे पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आणि त्या रजेंत मि. सय्यद महमद नायब तहशीलदार वर्ग १ यांस आक्टींग तहशीलदार नेमिलें.

मि. शेख इस्माय्ल एक्ट्रा असि. कमिशनर दर्यापूर, यांस वर्ग १ चे माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यांत आले.

क्याप्टन मॉडिट असिस्टंट कमिशनर उमरावती, यांस जून १९ तारखे पासून दोन महिने तीन दिवसांची हक्काची रजा मिळाली.

मि. एफ. डब्ल्यू. फ्रान्सीस डायरेक्टर लँड रिकार्ड खातें हे या आठवड्यांत तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जात असून त्यांचें काम असिस्टंट डायरेक्टर क्याप्टन ग्यारेट यांज कडे जादा देण्यांत येणार आहे.

मि. सी. ए. फ्रेझर पोलीस सुपरिन्टेंडंट यांस आजारीपणाच्या सर्टिफिकीटा वरून एक वर्षाची रजा मिळाली.

रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बि. ए. यांची स्वारी ता. २९ मीनहूम सहा दिवसांचे किरकोळ रजेवर जाणार आहे. कार्य साधूंनीं इकडे लक्ष द्यावें.

'नेटिव' या शब्दमंत्रानें आपणास सर्व अन्याय विसरलाच पाहिजे. रा. ब. नटार यांच्या वेळीं शिस्त आणि न्याय इतकी जागृत असत कीं बहुतेक जागा रिकाम्या झाल्यावर आह्मास त्या कोणास मिळतील याचें बहुत्र अचुक अनुमान करितां येत असे. पण आतां मनु बदलला. रा. सा. पटवर्धन यांनीं आतांच आपल्या भावी कारकिर्दीचे तीन चार विसार दिले देखील! त्यांतच मि. बाळ एक कोंकण प्रांतस्थ बि. ए. यांची वऱ्हाडांतील सारख्या विद्वत्तेचे अर्जदार व पूर्वीच खात्यांत लागलेले शिक्षक यांस मागें टाकून नेमणूक झाली. मि. बाळ यांची उमरावती हायस्कुलांत कायम पगार पन्नासवर नेमणूक झाली आहे. नटार वातम्या खऱ्या असतील तर लवकरच आणखी एक मासलेदार नेमणूक होणार आहे. पूर्वीच्या डायरेक्टरांच्या गोष्टी आपल्या पथ्यावर पडणाऱ्या असल्या तरच हल्लींचे रावसाहेब राबीचा पर्वत करून पुनींबिकाऱ्याच्या लिहिण्याचा मान राखण्याच्या मिषानें आपले हेतु सिद्धीस नेल्या शिवाय कधी रहाणार नाहींत असें दिसतें. इतर प्रसंगीं त्यांचें करणें भराभर उलटत चाललें आहे.

क्याप्टन शामिअर असि. कमिशनर हे निवर्तल्या मुळें गेल्या फेब्रवारी ९ तारखे पासून क्याप्टन हार्सब्रव यांस वर्ग २ चे असिस्टंट कमिशनर नेमिलें.

मेजर मारिस यांस बिन हक्काची रजा मिळाल्या मुळें गेल्या २८ एप्रिल पासून खालील बदल्या झाल्या आहेत:—

| नांव | बदली |
|---|---|
| खान बहादूर सय्यद शमसुद्दीन अली खान | डेपुटी कमिशनर वर्ग ३ |
| दस्तुर एदलजी बहिमनजी | स्पेशल असि. कमिशनर |
| मि. रुस्तुमजी फर्दूनजी | असि. कमि. वर्ग १ |
| क्या० माडिट. | असि. कमि. वर्ग २ |

येथील व्यापारी लोकांनीं सट्याचा व्यापार सपाट्यानें चालू केला आहे. मोंगलाई व इंग्रजी असे दोन प्रकार सट्याचे होते त्यांचा निराळेपणा सर्वांनीं काढून टाकिला. गुदस्ता सट्यावरील कराचें उत्पन्न सुमार अडीच हजार रुपये पर्यंत झालें.

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. वासुदेव काशिनाथ स्मालकाज कडील नाझर यांस उमरावती डेपुटी कमिशनरचे कचेरीत ९० रुपयांची जागा मिळाली.

---

नोटीस

रा. रा. किसन वल्द रुंजाजी सुतार राहणार मौजे कोठे तालुके अंकोट यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे मौजे कोठे येथील शेत सर्वे नंबर ३१ हे चार वर्षांच्या बोलीनें पट्यानें केलें असून त्याबद्दल कबुलायत तारीख ३० माहे मे सन १८९२ इ० ची लिहून दिली आहे. स्वामित्वाचे रुपये १३९ दर साल देत जावे व शेत नांगरून काळें साफ करावें असें न केल्यास सदर्हू शेत दुसऱ्यास लावून काढावें अशी कबुलायतींत शर्त आहे त्या प्रमाणें तुमच्याकडेस सन १८९२ च्या स्वामित्वाबद्दल रुपये १९ व सन १८९३ स्वामित्वा बदल रुपये ६ एकूण रुपये २१ व शिवाय व्याज हे नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांचे आंत आणून देऊन पावती घ्यावी व शेत वहावें नाहीं पेक्षां एकवीस रुपयांची कबुलायत लिहिल्या तारखेपासून व्याजासह जो पैसा होईल तो आणि नांगरण्यास व कुंदा वगैरे काढण्यास जो खर्च लागेल तो व शिवाय या नोटीशीस लागलेला खर्च एकूण सर्व झालेला खर्च तुमच्या जवळून कोर्ट मार्फत वसूल केला जाईल व शेत वरील मुदतींत पैसा न आल्यास दुसऱ्यास लाविलें जाईल नंतर तुमची कोणच्याही प्रकारची तकरार ऐकिली जाणार नाहीं. कळावें तारीख २१ माहे जून १८९४ इ०

सही

हरी वल्द हनवंती पाटील राहणार

अंबीकापूर ता० अकोला

---

## वर्तमानसार.

पुण्यास मराठी भाषेच्या संबंधानें खटपट करण्याकरितां महाराष्ट्र सरस्वति मंदिर या नांवाची एक संस्था उभी करण्याचें घाटत आहे व ग्रंथोत्तेजनासाठीं डेक्कनव्हरनाक्युलर सोसायटी नांवाची एक संस्था स्थापन करण्याचा उद्योग चालू आहे. असल्या प्रकारच्या संस्था फक्त पुण्यासच स्थापन व्हाव्या असें नाहीं तर आपल्या इलाख्यांत जितक्या ठिकाणीं स्थापन होण्यासारख्या असतील तितक्या ठिकाणीं त्या स्थापन कराव्या. म्हणजे ग्रंथोत्तेजन व भाषेचा उत्कर्ष लवकर होईल. या सारखीच गुजराथ व्हरन्याक्युलर सोसायटी स्थापन होऊन ती रजिस्टर करण्यांतही आली आहे. आतां तिची चांगली भरभराट आहे. फक्त गेल्या सालीं तिनें सुमारें १७।१८ पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं.

हैदराबाद असाइन्ड दिस्ट्रिक्टरामधील लोकांची हत्यारें घेण्याबद्दलचा कायदा केला. कां ठीक आहे कीं नाहीं! हा मुलूख निझामा कडून फौजेच्या खर्चाबद्दल घेतला तो त्यांचा त्याना ते पैसे देत असतांना परत न देतां उलट सर सालरजंगासारख्या मुत्सद्यांना ठपका देऊन त्या प्रांतांना हत्याराचा कायदा लागू केला काय ही दानत व राजनीति!!!

थोरलें कर्जबाजारी:— इटाली देशाचे राज्याच्या डोकीवर पांच अब्ज ९२ कोटी रुपयांचें कर्ज आहे. ह्या कर्जाप्रित्यर्थ सरसाल १९ कोटी रुपये व्याज द्यावें लागतें. सारांश या राज्यास सालिना जें उत्पन्न होतें त्याचा सरासरी निमे भाग व्याजांत जातो असें यावरून दिसतें. इतकें थोरलें कर्ज इतर कोणा राष्ट्रास नाहीं असें वाटतें. सु० प०

रशियांत धर पकड बरीच चालली आहे.

जागरणाची शिक्षा:—चिन देशांत कांहीं गुन्ह्याला जागरणाची शिक्षा आहे. ती शिक्षा झाली म्हणजे त्या कैद्यास आळीपाळीनें पहारेकरी लोक जागवितात. एक पळभर सुद्धां डोळा लागू देत नाहींत. एका व्यापाऱ्यानें आपल्या बायकोचा खून केला तेव्हां त्यास जागून मारावें अशी शिक्षा ठरली. त्या प्रमाणें पहारेकऱ्यांनीं त्यास जागविण्याची सुरवात केली. तेव्हां एकोणीसाव्या दिवशीं तो आपोआप मेला! मंत्री०

मध्यप्रांतांतील सागर जिल्ह्यांत पांच लक्ष मनुष्य दुष्काळपीडीत आहेत; त्यांतील अंध, पंगु, लुळे, अशा लोकांस पोटास मिळण्याची तजवीज सरकारानें केली आहे असें दिसत नाहीं. लोकाश्रयाची फार जरूर आहे.

पोस्टाच्या टिकिटां यावर लिहिणें किंवा छाप मारणें या संबंधी खालील ठराव झाला आहे, तो येत्या नोवेंबरच्या १ ले तारखे पासून अंमलांत यावयाचा आहे. तो ठराव असा:— ( १ ) टिकीट पोस्टाचें असलें पाहिजे. ( २ ) तें तिकीट खोडलेलें, फाटलेलें डाग पडलेलें किंवा तुकडे जोडलेले असें असतां कामा नये. ( ३ ) सरकारच्या अधिकारा खेरीज त्यावर कोणतेंही अक्षर, छाप, हातानें लिहिलेलें किंवा छापलेलें कांहीं असतां कामा नये. ( ४ ), तें टिकीट पाकिटापासून किंवा कार्डापासून कापून काढलेलें नसावें. [ ५ ] किंवा तें टिकीट पाकिटावर असून त्या पाकिटाच्या कागदाचा वर्तमानपत्र किंवा कांहीं कागद गुंडाळण्याकडे उपयोग करतां कामा नये, किंवा अर्धवट किंवा सगळें फाटलेलें नसावें. क० त०

येवलें तालुक्यांत साथरगांव येथें उदासारखें एक लहान जनावर आलें आहे तें रात्रीं मनुष्यास हुंगतें व तें मनुष्य तात्काळ मरतें!! हे जनावर हातीं लागत नाहीं. सर्व गांव काळजींत पडला आहे. रा० भू०

हल्लींच्या उपवदंधारी मंडळींना दारिद्रतेशिवाय दुसरा एक शत्रु करून घेतला आहे हा प्रबल शत्रु अमर्याद मद्यप्राशन होय. चांगल्या स्थितींत असलेल्या म्हणजे पैसे वगैरे जास्त मिळूं लागलेल्या डाक्टर व वकील लोकांत दारू पिण्याची व मांस खाण्याची सरशी होत चालली आहे. व यांच्या योगानें बरेच लोक काळाच्या तोंडांत पडले आहेत. परंतु अशा प्रकारच्या लोकांची कोष्टकांत गणना होणें कठीण आहे. कारण आपले आप्त किंवा प्रियजन मद्यप्राशनानें मेले असें सांगणारे लोक कमीच. गरीब असून पुढें उदयास आलेल्या लोकांपैकीं बरेच लोक पूर्वी प्रमाणें आत्मसंयमन करीत नाहींत. ऐषआरामींत दिवस घालवितात. पूर्वी प्राप्त करून घेतलेल्या विद्येचा व्यासंग ठेवीत नाहींत व पूर्वी जितक्या जोरानें मनावर दाब ठेवितात तितक्याच जोरानें भरभराटीचे काळीं मनाला मोकळें फिरूं देतात. तर अशा तऱ्हेचें सृष्टिक्रमाला सोडून जें आचरण घडतें त्याचा आयुष्यगतीवर कांहींना कांहीं परिणाम घडलाच पाहिजे. बि. ज्ञा. बि.

'आतां मरण बरें' हें दाखवितांना 'देशसेवक' कर्ते म्हणतात कीं आपण विद्येनें व शहाणपणानें इंग्रजांच्या बरोबरीचे असून एखाद्या साहेबांच्या मुलाला पटकन आ० सुपरिंटेंडन्टशिप आफ पोलीस ही जागा मिळते व तावडतोब घोडे, गाड्या उडवायला लागतो व आह्मी किती ही * * हापटली तरी बी. ए. झालें असतांही नायब तहसीलदारी देखील मिळत नाहीं वाईट वाटतें. एखाद्या मूर्ख व कमी शिकलेल्या युरोपियनाचा बंगला, घोडा गाडी, डामडौल पाहून आपल्या चंद्रमौळी घरार्शी, फाटक्या वस्त्राशीं व फुटक्या मडक्याशीं तुळणा केली म्हणजे गतवैभवाची आठवण होऊन डोळ्यांतून टिपें येतात, जीव हळहळतो व मनगटें चावून व हापटून स्वस्थ बसावें लागतें. खरोखर हल्लीं जी स्थिति दृष्टीस पडते त्यावरून अर्धपोटी व नष्ट स्थितींत राहण्यापेक्षां मरण बरें असें कोणीही समंजस, विचारी व शहाणा मनुष्य म्हणेल.

हल्लींच्या दंग्याचें खरें स्वरूप खालीं उत्कृष्ट दिलें आहे. एखादा अपराध झाला असला तर तो कोणी केला याचा तपास लागला नाहीं तर त्या अपराधापासून फायदा कोणाचा झाला याचा तपास लावला असतां अपराधी सांपडण्यास सुलभ पडतें, हें एक रोमन लॉचें तत्त्व आहे. त्या तत्त्वानुरोधानें पाहिलें असतां हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत हिंदूचा किंवा मुसलमानांचा हा फायदा नाहीं, परंतु सर रिचर्ड टेम्पल म्हणतात कीं त्यापासून आमचा फायदा झाला, व त्यापेक्षां त्यांचा फायदा झाला त्या पक्षीं तेच म्हणजे इंग्रज लोक अपराधी आहेत असा सिद्धान्त निघतो. दे० से०

निजाम सरकारानें जें एक नवीन कायदे कौंसल सुरू केलें आहे त्या संबंधानें हिंदुस्थान सरकाराशीं कांहीं विचारपूस करून समजूत घेण्या करितां हैदराबादच्या सिटी कोर्टाचे जज्ज राय हुकुमचंद हे हल्लीं सिमल्यास गेले आहेत असें सांगतात. हा कायदेकौंसलें स्थापन करण्याचा प्रकार इतर संस्थानांतही लवकरच सुरू होण्याचा रंग आहे असें दिसतें.

निझामांचे हल्लींचे आक्टिंग दिवाण नबाब विकार उल उमराव हेच बहुधा त्य जागीं कायम होणार असें सांगतात.

कोरियाचा दंगा बळावत चालला आहे.

जपानानें आपली फार मोठी फौज कोरिया येथें आपल्या हिताचें रक्षण करण्या करितां पाठविली आहे. कोरियाचा राजा जपानांत पळून गेला आहे असें सांगतात. अ० द०

फ्रान्स देशांत कांचेच्या विटा निघाल्या असून त्या भक्कमही असतात. कौलेंही कांचेचीं निघालीं आहेत. यावरून थोड्या दिवसांत तिकडील घरें पारदर्शक होतील असा अदमास वाटत आहे.

जर्मनींत काम करण्याच्या उपयोगावर हातांची व बोटांची किंमत काढली आहे ती अशी:— १०० रुपया पैकीं उजव्या हाताची किंमत ७० पासून ८० पर्यंत; डाव्या हाताची ६० पासून ७०; आंगठा २० पासून ३०; तर्जनी १४ पासून १८; अनामिका ८ पासून १३; मधलें बोट ७ पासून ९, करंगळी; ९ पासून बारा.

फ्रान्स देशांत एका गृहस्थानें हवेंत उडण्याचें यंत्र काढलें आहे तें अद्याप पूर्णतेस आलें नाहीं, पण डोंगरावर उभें राहून दुखापत झाल्या वांचून यंत्राच्या साह्यानें मनुष्य मैदानांत येऊं शकतें. पु० वै०

बडी चोरी— महंमुद गिजनीनें सोमनाथाचे देवळांत लूट केल्या नंतर दुसऱ्या कोणत्याही देवळांत येवढी मोठी चोरी कधीं ही झाल्याचें ऐकिलें नाहीं, अशी जबरदस्त व बडी चोरी केप कामोरिन ( रामेश्वर ) येथील देवीचे देवळांत ता० ३ मे रोजीं झाली. सुमारें २० लाख रुपयांचें जड जवाहिर गेलें. देवीचे अंगावर फार मोलवान हिरेजडित दागदागिने होते ते सर्व गेले. तिच्या नथेंत एक अतिशय मोलवान व तेजस्वी हिरा होता ती नथही चोरांनीं नेली. पूर्व दिवशीं सायंकाळीं पूजारी देवीची पूजा, आर्ती, वगैरे करून आपल्या घरीं गेला व दुसरे दिवशीं येऊन बघतो तों देवी एका काळ्या कपड्यामध्यें गुंडाळलेली त्याचे दृष्टीस पडली. तो कपडा काढून बघतां तों देवी अगदीं नागवलेली दिसली. पोलिसाकडे वर्दी दिली व झपाट्यानें तपास चालू झाला. परंतु पत्ता लागत नाहीं. त्रावणकोरच्या वगैरे महाराजांनीं ह्या देवीस लक्षावधीचे अलंकार व वस्त्रें वगैरे दिलीं होतीं. ह्या चोरीमुळें सर्व लोकांस फार वाईट वाटत आहे. इतकी मोठी चोरी अलीकडे कधींही कोठें झाली नव्हती. न्या० सु०

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोलें म्युनसिपल कमेटीचे हद्दीतील बारा फत्तराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलाव सन १८९४।९५ इसवी सालाबद्दल ता. ९ माहे जुलै सन १८९४ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहु वेळीं टाऊनहालांत हजर व्हावें कळावें तारीख ८।६।९४

Md. Husain
Secretary
A. M. C.


## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी – ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेळवे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएल्चें ( म्हणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनीं काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें बाजार भाव पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL**

*for the*

Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancel'ed Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws ), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.


हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.